**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र बळीराम मोरे, : अपीलकर्ता
रा. सालेगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत रुपुर, ता.कळमनुरी, जि. हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, रुपुर यांनी दि. २१.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, सन २००५ ते २०१० दरम्यान विकास

कामातील अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती तयार आहे व स्वत: कार्यालयात येऊन हस्तगत करावी कारण की, त्यांनी माहिती व्यक्तिश: मागितली आहे. तथापि आयोगास आढळून येत आहे की, दि. ०४.०१.२०११ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे की, गट विकास अधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलामध्ये नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी व निर्णय न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील सादर केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यानंतर अपिलार्थीने प्रथमत: माहिती हस्तगत करणे आवश्यक होते. त्यामध्ये काही त्रूटी आढळल्यास प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यावर ते जन अपिलीय अधिकारी यांना अवगत करुन देऊ शकले असते. अपिलार्थी यांनी माहितीकरिता अर्ज केला असल्यामुळे प्रथमत: त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे व ही बाब आवश्यक ठरत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत रुपुर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. सालेगाव,पो.सांडस, ता.कळमनुरी,जि.हिंगोली-४३१७०२.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,रुपूर, ता.कळमनुरी,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पं.स.कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>रा. वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>उपसचिव,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद- प्रतिनिधी - श्री. बी. बी. राठोड, सहायक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपसचिव,राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद - श्री. खालीद ब.अरब | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांचा मूळ अर्ज तसेच प्रथम अपील अर्ज त्यांच्या

कार्यालयास प्राप्त झाला नाही, असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास सांगितले. अपिलार्थी यांनी याबाबतचा पुरावा देण्यात येईल, असे आयोगास सांगितले. सदरचा पुरावा अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावा लागेल. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना त्यावर त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत माहिती देण्यासंदर्भात उचित कार्यवाही करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,राज्य माहिती आयोग, खंडपीठऔरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>रा. वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>परिमंडळ कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>परिमंडळ कार्यालय, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, परभणी/हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२८७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुका नुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षांशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १८.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१८.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदींचा विचार करुन हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी/हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी/हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- नायब तहसीलदार (पु),तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली - श्री. फुफाटे डी.डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, वसमत, जि. हिंगोली -प्रतिनिधी - श्री. एन.एम.शिंदे,अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०१.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०४.२०१० (फेरसादर दि.२०.११.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९९६-२०१० या पंधरा वर्षांच्या कालावधीतील त्रयस्थ पक्ष साई गॅस

एजन्सीबाबत प्राप्त तक्रार अर्ज व त्यांचा कारणासह तपशील अशी माहिती मागितली होती. ही माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी आयोगापुढे ही बाब मान्य केली. तथापि त्यांना मिळालेली माहिती दिशाभूल करणारी आहे, असे मोघम स्वरुपात आयोगास सांगितले. आयोगाने यावर नेमकी दिशाभूल करणारी माहिती कोणती, याबाबत विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणताही युक्तिवाद करु शकले नाहीत. सबब अपिलार्थीने प्रथमतः त्यांना देण्यात आलेली माहिती त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने तपासून त्यात काही त्रूटी आढळल्यास पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवाव्यात व त्यानंतर त्रूटीच्या संदर्भात पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना उर्वरित माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम दगडूजी बगाटे, : अपीलकर्ता
रा. हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पुरवठा विभाग, तहसील कार्यालय,
हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हिंगोली - श्री. व्ही. एस. आकुलवार | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी सांगितले केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली श्री. फारुखखॉ मुनिरखॉ रंगरेज या किरकोळ केरोसीन परवानाधारक यांच्या केरोसिन वितरणाबाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध असून ती माहिती हस्तगत

करावी, असे दि. १४.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थी यांना माहिती मिळाली आहे, अशी त्यांनी पोच दिली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये माहिती मिळाली आहे. तथापि अपूरी/दिशाभूल करणारी आहे, असे मोघम नमूद केले आहे. याबाबत अपिलार्थीस पंधरा दिवसांच्याआत नेमका उल्लेख जन माहिती अधिकारी यांना कळवावा लागेल. त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उर्वरित माहिती द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे, सिध्दार्थनगर,दुध डेअरी, हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. संतोष यल्हाजी बांगर, रा.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>लिपीक,<br>पाणी पुरवठा विभाग,नगरपरिषद, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष यल्हाजी बांगर | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लिपीक (पाणी पुरवठा)<br>न.प.हिंगोली - श्री. रघुनाथ वि.बांगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, न.प.हिंगोली -<br>प्रतिनिधी - श्री. विनय साहू,लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये सन २००९-२०१० मध्ये नवीन पाईप लाईन करिता खरेदी करण्यात आलेल्या पाईपसंदर्भात संपूर्ण संचिकेची कार्यालयीन टिपणीसह पहाणी

मागितली होती व जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.०८.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस या संचिकेची पहाणी करुन त्यांना हवी असलेली माहिती हस्तगत करण्यास्तव कळविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस मिळाले आहे व अपिलार्थी यांनी दि. १७.०८.२०१० रोजी कागदपत्रांची पहाणी केली व त्यामध्ये त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी दिली आहेत. ही बाब उपलब्ध कागदपत्रांमध्ये आढळून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, रा.मंगळवारा बाजार, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक (पाणी पुरवठा) न.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, न.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली/परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुका नुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२९.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदींचा विचार करुन हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, हिंगोली/परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
उपविभागीय अधिकारी,वसमत, जि.हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- तहसीलदारा, वसमत,जि.हिंगोली- प्रतिनिधी - श्री. फुफाटे डी.टी.,नायब तहसीलदार (पु) | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली -प्रतिनिधी - श्री. एन.एम.शिंदे, अ.का. | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.०६.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थीने श्री साईसेवा गॅस एजन्सीबाबत सन १९९५-२०१० या कालावधीमधील काही माहिती मागितली आहे. ती माहिती प्रथमतः अपिलार्थीस दि. ०२.०६.२०१० रोजी देण्यात आली तथापि ती

अपिलार्थीस मिळाली नाही. तदनंतर ती माहिती पुन्हा दि. ०९.०६.२०१० रोजी पोस्टाने पाठविली आहे व ती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. ही बाब अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीच्यावेळी मान्य केली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), तहसील कार्यालय वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख नईम शेख लाल,<br>रा.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी,यवतमाळ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगर पालिका प्रशासन),जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ- श्री. राजेश मनोहर मोहिते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ - प्रतिनिधी - श्री. एल.एन.बागुल, तहसीलदार (महसूल) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.११.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहे.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगर परिषद प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी

यांनी त्यांच्या दि. ०६.१०.२०१० रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जान्वये संबंधित तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद यांच्याविरुध्द काय कारवाई केली, याबाबतची माहिती मागितली आहे. या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, उपजिल्हाधिकारी, पुसद यांच्या दि. १३.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणासंदर्भात उपमुख्य लेखा परीक्षक (स्थानिक निधी लेखा) यांना चौकशी करण्याबाबत कळविले आहे. चौकशी अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. ही बाब अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगर परिषद प्रशासन) यांनी दि. १९.१०.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. आजमितीस सदरचा अहवाल अप्राप्त आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी दि. २८.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये या द्वितीय अपिलाबाबत आयोगास आपले लेखी म्हणणे सादर केले आहे. ते विचारात घेण्यात आले. आज आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे पाहण्यात आली. यावरुन असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे चौकशी अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस तो अहवाल देता आलेला नाही. तसेच ही बाब अपिलार्थीस विहित मुदतीत कळविण्यात आलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल,नवीन पाण्याच्या टाकीजवळ,पलटन,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी (न. प. प्रशासन),जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्रनाथ विश्वनाथ बांगर,<br>हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर विकास विभाग,<br>मंत्रालय, मुंबई. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसचिव,<br>नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रविंद्रनाथ विश्वनाथ बांगर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- - कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग,कार्यासन नवि-१७,मंत्रालय,मुंबई- श्री.वि.बा. सुपेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई - श्री. अ.बा.घरत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६.१०.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. अपिलार्थी यांनी दि. १६.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये हिंगोली नगर परिषद अंतर्गत तृतिय श्रेणी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था यांना घरे बांधण्यासाठीच्या जागेच्या संदर्भात दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती मंत्रालयात उपलब्ध होऊ न शकल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज नगर परिषद, हिंगोली यांच्याकडे दि. २८.०७.२००९ रोजी वर्ग करण्यात आला. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. ०५.०९.२००९ रोजी नगर परिषदेकडे संपर्क साधला.अपिलार्थीस नगर परिषदेतर्फे मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील काही माहिती प्राप्त झालेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, मुद्दा क्र.२ ची माहिती - महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाची सत्यप्रत - अद्यापपावेतो त्यांना मिळालेली नाही. अशाप्रकारचे आदेश राज्यपाल काढत नसून संबंधित प्रशासकीय विभागामार्फत काढले जातात व संदर्भित आदेश नगर विकास (कार्यासन नवि-९) विभागामार्फत काढण्यात आलेला आहे, असे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अवगत केले. यास्तव संबंधित विभागाच्या कक्ष अधिकाऱ्याकडून (Deemed P.I.O.)प्रस्तुत शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त करुन घ्यावी लागेल व तदनंतर ही प्रत तात्काळ अपिलार्थीस द्यावी लागेल, असे आयोगाचे मत आहे. सदर शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-९ यांचीही तितकीच राहील.त्याचप्रमाणे मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली यांनाही सदर शासन निर्णयाच्या प्रतीचा आपल्या कार्यालयात शोध घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी लागेल

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात संदर्भित केलेली व वर नमूद केलेल्या शासन निर्णयाची छायांकित प्रत आयोगाचे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे तीस दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्रनाथ विश्वनाथ बांगर, मंगळवारा बाजार गेट, पाण्याच्या टाकीजवळ,हिंगोली

२. मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्यासन नवि-१७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कार्यासन नवि-९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक राधाकिशन धोटे, : अपीलकर्ता
रा. हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसचिव, कार्यासन-१७,
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१०.२००९ (फेरसादर,दि.२४.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अपील प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती

अधिकारी तथा अवर सचिव (सा.प्र.वि.कार्यासन-१७) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सा.प्र.वि.) यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (कार्यासन-१७) सा.प्र.वि., जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (सा.प्र.वि.) यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक राधाकिशन धोटे, रा.पोलीस वायरलेस, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१२,नांदेड रोड, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (कार्यासन-१७) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव (कार्यासन-१७) सामान्य प्रशासन विभाग,पाचवा मजला, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्हाजी बांगर, रा.हिंगोली : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली : उत्तरवादी
जन अपिलीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष यल्हाजी बांगर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (म),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली - श्री. ए.एस.लांडेपाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - निवासी उपजिल्हाधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याबाबत आयोगाने नाराजी व्यक्त केली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),हिंगोली अपिलार्थीच्या दि. ०९.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भातील सद्यस्थिती आयोगास सांगू शकले नाहीत. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे यावरही सुनावणी झालेली नाही, ही बाब आयोगास गंभीर वाटते. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन

आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. १३.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, रा.मंगळवारा बाजार,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पोलीस उपविभागीय अधिकारी, वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती उपविभागीय अधिकारी, वसमत यांनी दिली आहे. तथापि ती माहिती अपूर्ण आहे तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचे प्रथम अपिलावर सुनावणी घेतली आहे. तथापि त्या सुनावणीस अपिलार्थी काही कारणामुळे उपस्थित राहू शकले नव्हते. अपिलार्थी यांनी त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले. अपिलार्थी यांनी नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही

बाब स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत यांना मूळ अर्जाच्या संदर्भात उर्वरित माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,वसमत, जि.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पोलीस स्टेशन, वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), वसमत, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली तसेच जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी (ग्रामीण), वसमत हे कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तात असल्याने व पोलीस अधीक्षक, हिंगोली रजेवर असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत, असे त्यांचे दि. २८.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. ही

बाब आयोगाने अपिलार्थीच्या उपस्थितीत विचारात घेतली व त्यास अपिलार्थी यांनी त्यांची सहमती असल्याचे मान्य केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. २०.१०.२०१० रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्षासंदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे व यापैकी मागितलेली माहिती दि. २३.११.२०१० व २७.१२.२०१० रोजीच्या उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत यांच्या पत्राद्वारे पाच मुद्यांवर प्राप्त झाली आहे. तथापि त्यामध्ये त्यांना मुद्दा क्र. ६ च्या संदर्भातील माहिती मिळालेली नाही. मुद्दा क्र.६ मध्ये अपिलार्थी यांनी खुलासा मागितला आहे व ही बाब अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत येत नाही,त्यामुळे त्यांना देय होत नाही, असे आयोगाने सुनावणीच्यावेळी स्पष्ट केले.

या सर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी,<br>रा.वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी - श्री. डी.के.इंगोले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी

त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुकानुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमत: अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी/हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १९.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी/हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१९.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदींचा विचार करुन हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी/हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी/हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.परभणी/हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कनकुटे राजेंद्र हिरामण : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी-तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली - प्रतिनिधी- श्री. फुफाटे डी.डी. नायब तहसीलदार (म) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी, वसमत, जि. हिंगोली -प्रतिनिधी - श्री. एन.एम.शिंदे,व.लि. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.०४.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा दि. ०३.०४.२०१० रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दि. ०७.०४.२०१० रोजी प्राप्त झाला.त्यानंतर दि. ३०.०४.२०१० रोजी संबंधित त्रयस्थ पक्ष-स्वस्त धान्य दुकान

परवानाधारकाकडून माहिती मागविण्यात आली. संबंधितांकडून दि. ३१.०८.२०१० रोजी पाठपुरावा करुन माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे व ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील प्रश्नार्थक/खुलासेवजा माहिती वगळून इतर मुद्यांवरील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्यावी लागेल.अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात झालेल्या विलंबाबाबत, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वसमत यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा मागवावा लागेल व असमर्थनीय विलंब झाल्याचे आढळून आल्यास योग्य ती कार्यवाही योजावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील प्रश्नार्थक/खुलासेवजा माहिती वगळून इतर मुद्यांवरील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कनकुटे राजेंद्र हिरामण,रा.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,वसमत,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी,<br>रा.वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (सा.प्र.वि.),<br>जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- लिपीक, भुसूधार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली - श्रीमती व्ही. एफ. काझी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपजिल्हाधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली -प्रतिनिधी- ए. एस. लांडेपाटील, नायब तहसीलदार (म) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीचा दि. ०६.०८.२०१० रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दि. १६.०९.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यानुसार दि. २४.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध असून त्याकरिता ` २/- प्रतिपृष्ठ दराप्रमाणे शुल्क स्टेट बँक ऑफ हैद्राबाद मध्ये भरणा करुन माहिती हस्तगत करण्याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. तथापि त्यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यानंतर दि. ०४.११.२०१० रोजी अपिलार्थीस ही माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य) यांनी सूचित केल्याप्रमाणे विनामूल्य देण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्याची पोचपावती अपिलार्थीने दिलेली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, भुसूधार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. तातेराव रामजी जाधव,<br>रा.सुरजखेडा, ता. सेनगाव, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उपविभागीय अधिकारी, हिंगोली (ग्रामीण) | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०९.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली तसेच जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (ग्रामीण) हे कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तात असल्याने व पोलीस अधीक्षक, हिंगोली रजेवर असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत, असे त्यांचे दि. २८.०२.२०११ रोजीच्या फॅक्स संदेशद्वारे कळविले आहे. ही बाब आयोग विचारात घेत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतांना असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, अपिलार्थी यांचे त्यांच्या प्रथम अपिलामधील, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याचे म्हणणे खरे नसून उपलब्ध माहिती देण्यात आली व अपिलामध्ये तथ्य आढळले नाही, यावरुन अपील निकाली काढण्याचा निर्णय दि. १८.०९.२०१० रोजी दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर द्वितीय अपील दाखल करताना अपिलार्थी यांनी जी कारणे नमूद केली आहेत. त्यावरुन त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात देय असलेली व पुरविण्यात आलेली माहिती याची पडताळणी करुन या प्रकरणाकडे एक विशेष बाब म्हणून पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना व्यक्तिशः पहावे लागेल व माहिती देय असल्यास अपिलार्थीस द्यावी लागेल अथवा दिलेली माहिती योग्य आढळल्यास तसे कळवावे लागेल. ही प्रक्रिया पोलीस अधीक्षक यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०१-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तातेराव रामजी जाधव, रा. सुरजखेडा, पो.कडोळी, ता.सेनगाव,जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (ग्रामीण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी,<br>रा.वसमत, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, वसमत, जि.हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, वसमत,जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०१-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०४.१०.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.११.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती अवगत होऊ शकत नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष श्रीमती प्रेमलता मठपती यांच्यासंदर्भात व्यक्तिगत माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

याकरिता त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत आहे. त्यानुसार जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ११ मधील परंतुकानुसार व्यापक जनहिताचा मुद्दा विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, वसमत,जि.हिंगोली अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०४.१०.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदींचा विचार करुन हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक 	०१-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार ओमशंकर स्वामी, दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ, देशपांडे पेट्रोलपंपाजवळ, वसमतनगर, जि.हिंगोली - ४३१५१२.

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | डॉ. सुभाष शिवाजीराव बोंडे,<br>मु. पो. जवळा बाजार, तालुका औंढा नागनाथ,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - डॉ. सुभाष शिवाजीराव बोंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२६-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी दिनांक ३.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संदर्भात लेखा परिक्षण अहवाल व इतर काही माहिती एकूण चार मुद्यांद्वारे मागितली आहे.प्राचार्य, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याालय

औंढा(ना.), ता.औंढा, जिल्हा हिंगोली यांनी शैक्षणिक वर्ष सन २००१-२००२,२००२-२००३,२००३-२००४ या वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाची व इतर ३ मुद्दे (अ.क्र.२,३,४)ची माहिती दिली आहे.परंतु सन २००४-२००५, व २००५-२००६ या शैक्षणिक वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाची प्रत दिलेली नाही.दोन वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालासाठी प्राचार्य, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याालय औंढा(ना) यांनी दिनांक १६.१२.२००८ च्या पत्रान्वये दोन हजार रुपये शुल्काचा भरणा करण्याबाबत कळविले आहे.यावर अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, ही मागणी विहित मुदतीनंतर केली असल्यामुळे त्यानी मागितलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात यावी. ही बाब आयोगाने मान्य केली.अपिलार्थी यांना २००४-२००५ व २००५-२००६ या शैक्षणिक वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रतींची माहिती देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. प्रकरण जुने असल्याने या प्रकरणात सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग यांनी व्यक्तिशः लक्ष घालून विशेष बाब म्हणून ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देतील, असे पहावे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी सन २००४-२००५ व २००५-२००६ या शैक्षणिक वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, असे व्यक्तिशः पहावे. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. सुभाष शिवाजीराव बोंडे, मु. पो. जवळा बाजार, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय औंढा(ना.)जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा(ना.)जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. डॉ.उर्मिला धुत, सह संचालक(उच्च शिक्षण) नांदेड विभाग नांदेड (शासकीय तंत्रनिकेतन परिसर बाबानगर, नांदेड) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आबासाहेब नानाराव, : अपीलकर्ता
शहरपेठ, भोसले गल्ली, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वसमत, जि.हिंगोली - श्री. एस.एफ.वसमतकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - श्री. एस.आर.बलारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि. १७.०८.२०१० रोजी पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यातील मुद्दा क्र. २,३ व ४ प्रश्नार्थक स्वरुपात आहे. त्यामुळे ती माहिती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येतील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे देय होत नाही. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. उपलब्ध

कागदपत्रांवरुन व आयोगापुढे करण्यात आलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०३-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आबासाहेब नानाराव, शहरपेठ, भोसले गल्ली, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. खंदारे श्यामसुंदर नागोजी,<br>मु. पो. बऊर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खंदारे श्यामसुंदर नागोजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बऊर ता.कळमनुरी, जि.हिंगोली - श्री. एम.व्ही.माळोदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी कळमनुरी , जि.हिंगोली- श्री. पी.डी.पट्टेवाले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बऊर, ता.कळमनुरी यांनी आयोगास अवगत केले की, ते या पदावर सन २००६ पासून कार्यरत आहेत. त्यांनी आज युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती देता आली नाही, असे आयोगास सांगितले. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळमनुरी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक ०४.०९.२०१० रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला आहे. अपिलार्थी यांना याची

प्रत दिलेली आहे. अपिलार्थी यांना त्या पत्राची प्रत प्राप्त झाली आहे, असे सुनावणीच्या वेळी त्यांनी मान्य केले तथापि त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही, असे त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थी यांनी एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली आहे. ती त्यांना देय होत आहे. सुनावणीमध्ये अपिलार्थीस मुद्दा क्र. २-संदर्भात फक्त अपिलार्थीस त्यांच्या एका कुटुंबाच्या ब प्रपत्राची प्रत देण्यात आली आहे, असे आयोगास सांगितले. तथापि त्यांना सर्व एकूण १५२ कुटुंबाच्या ब प्रपत्राच्या झेरॉक्स प्रती द्याव्या लागतील. मुद्दा क्र. ३, ४ व ५ बाबतचे शासननिर्णय/परिपत्रके/ज्ञापने इ.च्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस देय होतात. ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल व मुद्दा क्र. १ व २ ची माहिती तपशीलवार द्यावी लागेल. ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, दि. २२.०२.२०११ रोजी काही माहिती अपिलार्थीस पाठविली आहे. याचीही पहाणी अपिलार्थी यांनी करावी. तथापि वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती व शासन निर्णय व परिपत्रकांच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पाठवाव्या लागतील.

एकंदरीत या माहितीसाठीच्या अर्जाकडे जन माहिती अधिकारी यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे, असे आयोगाचे मत आहे. याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.,हिंगोली यांचे लक्ष वेधण्यात येत आहे व कळमनुरी तालुक्यामध्ये त्यांच्या अधिनस्त कार्यालयामधील प्रशासकीय सेवेमध्ये आमुलाग्र सुधारणा होईल, याची मोहिम त्यांनी हाती घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व तसेच या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी व्यक्तिशः लक्ष द्यावे व प्रकरण निकाली निघेल, यासाठी कार्यवाही योजावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत

नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खंदारे श्यामसुंदर नागोजी, मु. पो. बऊर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत बऊर, तालुका कळमनुरी,जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती कळमनुरी,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुभाष रामराव कदम,<br>मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जि. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुभाष रामराव कदम | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी -डॉ.विलास यशवंतराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण ), नांदेड विभाग,नांदेड- प्रतिनिधी - श्री दीपक देशपांडे, लघुलेखक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दिनांक नमूद केलेला नाही |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८-०६-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, संबंधित बी. रघुनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास शासनाचे पूर्ण अनुदान आहे व या महाविद्यालयास माहिती अधिकार

अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होतात. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २२.०३.२०१० रोजीच्या अर्जान्वये या महाविद्यालयासंदर्भात एकूण तीन मुद्यावर माहिती मागितली आहे. ती त्यांनी अपिलार्थीस दि. १४.०७.२०१० रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले व यासंदर्भात पोस्टाचा दाखला आयोगास सादर केला. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांनी दि. २४.०६.२०१० रोजी सुनावणी घेतली आहे. आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना मिळालेली नाही व मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात माहिती अपूर्ण दिली आहे, असा मोघम उल्लेख केला आहे. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या माहितीबाबत नेमकी कोणती माहिती अपुरी/चुकीची आहे याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग,नांदेड यांना पंधरा दिवसांचे आत स्पष्टपणे कळवावे. तदनंतर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग,नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीची प्रथम पडताळणी करावी लागेल व अपुरी माहिती दिलेली असल्यास उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी लागेल.

प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावला असल्याचे दिसून येत आहे. भविष्यात त्यांना विहित मुदतीत माहिती देण्यासाठी दक्ष राहावे लागेल. याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग,नांदेड यांनी समज द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष रामराव कदम, मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नजीर अहेमद पुसेगांवकर, : अपीलकर्ता
(अध्यक्ष, महाराष्ट्र सा. वृत्तपत्र परिषद, हिंगोली), मु. पो. पुसेगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,
तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नजीर अहेमद पुसेगांवकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती सेनगांव, जि.हिंगोली - श्री मनोज लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती सेनगांव, जि. हिंगोली - श्री आर.बी.बोरुड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जासंदर्भात माहिती सन २००० ते २०१० या कालावधीची असून ती संकलीत करण्यास वेळ लागला. अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यासाठी आता तयार आहे. ती माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल, असे आयोगाने सूचित केले.त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी

ती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने ती स्वीकारली. अपिलार्थी यांनी माहितीची पहाणी करावी व त्यामध्ये काही त्रूटी आढळल्यास जन माहिती अधिकारी यांना याबाबत पंधरा दिवसांचे आत कळवावे व तदनंतर पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यानुसार माहिती पुरवावी लागेल.ही प्रक्रिया हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत होईल, याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नजीर अहेमद पुसेगांवकर, (अध्यक्ष, महाराष्ट्र सा. वृत्तपत्र परिषद हिंगोली), मु. पो. पुसेगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव,<br>रा. समता कॉलनी, सेनगांव, तालुका सेनगांव,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही, असे आयोगास अवगत केले. ही बाब तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांची अनुपस्थिती याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.पुढील सुनावणीस अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, सध्याचे व तत्कालीन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव, रा. समता कॉलनी, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुजाहेद शरीफ हमीद शरीफ,<br>रा. पठाण मोहल्ला, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मुजाहेद शरीफ हमीद शरीफ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,वसमत - श्री एस.एफ.वसमतकर, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - श्री एस.आर.बलारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी सांगीतले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांनी उपलब्ध केली असून अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे ती त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः देऊ केली होती. तथापि ती त्यांनी स्वीकारली नाही.

अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी प्रथम अपील सादर केले असल्यामुळे माहिती स्वीकारली नाही. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थीने मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्यावर काही त्रूटी आढळल्यास त्याबाबत त्यांना पंधरा दिवसांच्या जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व तदनंतर पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना त्यानुसार माहिती द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुजाहेद शरीफ हमीद शरीफ, रा. पठाण मोहल्ला, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बाधकाम उप विभाग, वसमत, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. उत्तम दगडु बगाटे रा.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, हिंगोली | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उत्तम दगडु बगाटे. | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हिंगोली - श्री.व्ही.एस.अकुलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली - श्री.एस.जी.भुसेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.१२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी यांचे म्हणने ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडू बगाटे, सिध्दार्थनगर, दूध डेअरीसमोर, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणेश ईरन्ना चौधरी,<br>रा. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणेश ईरन्ना चौधरी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद हिंगोली - श्री.बी.ए.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली -डॉ प्रदीप ठेंगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मुळ अर्जाद्वारे मागितलेली एकूण ३ मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना दिनांक १८.०८.२०१० रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी सुनावणी घेवून निर्णय पारित करताना, अपील अमान्य केल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, दिनांक ३.६.२०१० रोजी एकूण १२० प्रतीसाठी ` २४०/- शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा दिनांक ७.८.२००९ रोजी शुल्क भरुन माहिती घेवून जाण्याचे कळविण्यात आले आहे. त्यानंतर

वर नमूद केल्या प्रमाणे अपिलार्थीस दिनांक १८.८.२०१० रोजी विनामूल्य माहिती दिली आहे.अपिलार्थीने ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य केली. तथापि अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. ३ - वाहनांची संख्या व तपशील- या संदर्भातील माहिती अपूर्ण मिळाली आहे. यास्तव सदर मुद्यासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित- वाहनांची संख्या व तपशील - याबाबतची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणेश ईरन्ना चौधरी, गाडीपुरा, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

कु. राजश्री सुभाष गोरे (शिपाई), : अपीलकर्ता
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - कु. राजश्री सुभाष गोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(सा.), जिल्हा परिषद हिंगोली - श्री जी.पी.डोल्हारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली - श्री विकास पुजारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (सा.)जि.प.हिंगोली यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१.०१.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती विविध स्तरावरुन त्यांना देण्यात आली आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती पंचायत समिती स्तरावरील होती व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती महिला तक्रार निवारण कक्षाकडे उपलब्ध होती.

अपिलार्थीने आयोगासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, मुद्दा क्रमांक १ शी संबंधित कोणतीही माहिती त्यांना मिळालेली नाही. मुद्दा क्रमांक २ अपूर्ण असून ती खालीलप्रमाणे आहे.

संबंधित श्री. जावेद शेख अब्दुल सत्तार,व.स.यांच्या संदर्भातील तक्रारी व झालेल्या चौकशी अहवालाच्या प्रती देण्यात आल्या नाहीत.

मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती दिलेली नाही.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलार्थीस आजपर्यंत दिलेल्या माहितीची तपासणी करावी व यापैकी जी माहिती अपूर्ण असेल ती माहिती अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी. अपिलार्थी यांनी पुढे असेही सांगितले की, ` २४६/- शुल्क भरुनही त्यांना माहिती मुदतीत देण्यात आली नाही. ही बाब देखील मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांनी तपासावी व तसे आढळल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांना शुल्काची रक्कम अपिलार्थीस परत करावी लागेल.अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील श्री. गिरी, तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सेवापुस्तिकेच्या माहितीबाबत - त्यांच्या सेवेशी संबंधित माहिती (वैयक्तिक माहिती वगळून) अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांनी व्यक्तिशः लक्ष द्यावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०३-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. कु. राजश्री सुभाष गोरे (शिपाई), गट शिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा  उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहंमद अब्दुल सलीम मोहम्मद अब्दुल हकीम कुरेशी, पेन्शनपुरा मस्जिदच्या पाठीमागे, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अब्दुल सलीम मोहम्मद अब्दुल हकीम कुरेशी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद हिंगोली - श्री. किशोर खंडेलवाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली - डॉ.प्रदीप ठेंगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद हिंगोली यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस दि. १८.०३.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. तथापि त्यांच्या युक्तिवादात अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती मिळालेली नाही.

यास्तव जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या संपूर्ण माहितीची पाहणी त्यांच्या कार्यालयात द्यावी लागेल. याकरिता मुख्याधिकारी, नगर परिषद यांना व्यक्तिशः लक्ष घालावे लागेल. यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात या माहितीच्या अभिलेखांची पहाणी करण्याकरिता एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन त्यातील अपिलार्थीस काही आवश्यक असलेली काही कागदपत्रे छायांकित करुन देण्याची व्यवस्था करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल. अपिलार्थी यांनी या माहितीची पहाणी करावी व त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यांनी पंधरा दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना तसे कळवावे व तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने बरोबर माहिती पुरवावी लागेल.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या दि. १८.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्याकडील १९७०-७५ च्या रिव्हीजन रजिस्टरमध्ये संबंधित नोंद उपलब्ध असल्याचे कळविले आहे, असे आयोगास सांगितले. तथापि ही नोंद ज्या कागदपत्रांच्या आधारे झाली ती कागदपत्रे उपलब्ध होणे आवश्यक आहे. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, ती कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत व गहाळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणासंदर्भात महत्त्वाच्या माहितीची कागदपत्रे सुरक्षित जतन करण्यासंदर्भात नगर परिषदेअंतर्गत जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केली आहे किंवा कसे, याबाबत सखोल चौकशी प्रधान सचिव,नगर विकास विभाग यांना करावी लागेल. त्याप्रमाणे संबंधित अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास प्रशासकीय कार्यवाही करावी लागेल. त्याचप्रमाणे अशा जमिनीच्या संदर्भातील महत्त्वाचे दस्तऐवज योग्यप्रकारे जतन होण्याकरिता शासनस्तरावर योग्य सूचना निर्गमित कराव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) सुनिश्चित करुन त्यांच्या कार्यालयातील संबंधित सर्व अभिलेखे पहाणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. ही प्रक्रिया हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वरील प्रकरणात सखोल चौकशी करुन दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर आवश्यक असल्यास प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व नगर परिषद कार्यालये महत्त्वाचे अभिलेख/दस्तावेज सुरक्षित जतन कसे करतील याकरिता कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल सलीम मोहम्मद अब्दुल हकीम कुरेशी, पेन्शनपुरा मस्जिदच्या पाठीमागे, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. प्रधान सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दत्ता पंडितराव अडकिने, : अपीलकर्ता
व्दारा, पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म.), तहसील कार्यालय,वसमत, जि. हिंगोली- श्री यु.आर.बोथीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार वसमत, जि. हिंगोली - श्री अनिल माचेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०७-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(म.) तहसिल कार्यालय, वसमत यांनी सुनावणीचे वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली काही माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०८

जून, २०१० पर्यंत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०९.०६.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिली, असे त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये माहिती दिलेली नाही व त्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही, असे नमूद केले आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी सन २००५-०६ च्या नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात एकूण दहा मुद्यांवर विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. ही माहिती त्यांनी व्यक्तिशः मागितलेली आहे. याकरिता तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (सकाळी ११ ते सायं.५.००) सुनिश्चित करुन अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे अपिलार्थीस पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी विनामूल्य देतील अशी व्यवस्था करावी. केलेल्या व्यवस्थेबाबतची लेखी कल्पना त्यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेली काही कागदपत्रे जन माहिती अधिकारी छायांकीत करुन विनामूल्य देतील अशी व्यवस्था करावी. अपिलार्थीस त्याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे. ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्ता पंडितराव अडकिने, व्दारा, पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थनगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार वसमत (म.),जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. महेंद्र श्रीनिवास मंगरुलकर,<br>देवडानगर, प्लॉट नं. २०, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. महेंद्र श्रीनिवास मंगरुलकर | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली - श्री. एस.जी. भुसेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी हिंगोली - प्रतिनिधी - श्री. ए.बी.पटवे, अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांचे पत्र दिनांक २९.०४.२०१० अन्वये अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जुनी असल्याने तिचा कार्यालयात शोध घेण्याचे काम चालू असून माहिती प्राप्त होताच अपिलार्थीस पाठविण्यात येईल.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वारसा हक्क प्रमाणपत्र व शासन परिपत्रकाची माहिती अपिलार्थीस देय होत असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील वर नमूद केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महेंद्र श्रीनिवास मंगरुलकर, देवडानगर, प्लॉट नं. २०, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नामदेव महेपती हरण,<br>मु. पो. सावरखेडा, तालुका जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, बासंबा, तालुका जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नामदेव महेपती हरण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (शहर) - श्री.एल.एम.वडजे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री.रमेश जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०३-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे.अपिलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी दिनांक २/४/२०१० रोजी सुनावणी घेतली. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते. यावेळी अपिलार्थीच्या विविध अर्जावर केलेल्या कार्यवाही बाबतचे व दिलेल्या माहितीबाबतचे गैरसमज दूर करण्यात आले ही बाब अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

या पार्श्वभुमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नामदेव महेपती हरण, मु. पो. सावरखेडा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली (शहर),ता. जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रीमती ऐलाबाई भ्र. महेपती हरण,<br>मु. पो. सावरखेडा, तालुका जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, बासंबा, तालुका जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२५९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी हिंगोली (शहर) - श्री.एल.एम.वडजे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री. रमेश उत्तम जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७-०५-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०२.०४.२०१० रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०७.०५.२०१० रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये नमूद केले आहे की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची छायांकित प्रत अपिलार्थीचा मुलगा श्री नारायण म.हरण यांना देण्यात आली आहे. त्यावर त्यांनी

स्वाक्षरी केली आहे. या माहितीवर त्यांचे समाधान झाले आहे. आयोगापुढील कागदपत्रवरुनही ही बाब योग्य आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय आयोग कायम ठेवत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती ऐलाबाई भ्र. महेपती हरण, मु. पो. सावरखेडा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी हिंगोली (शहर), ता.जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ, : अपीलकर्ता
मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. काजी अजगरखाँ हयातखाँ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगोली - श्री. एस. जी. भुसेवाड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी हिंगोली यांचे प्रतिनिधी - श्री.ए. बी. पटवे, अव्वल कारकुन | : | उपस्थित. |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडील दि. २२.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावी, असे अपिलार्थीस कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अपिलार्थीस ही माहिती दि. २७.११.२०१० रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना अपिलार्थीस माहिती द्यावी, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना माहिती मिळालेली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती दिली आहे, असे सांगत आहेत, ती दुसऱ्या प्रकरणातील आहे, ही बाब तहसीलदार यांनी व्यक्तिशः तपासावी.यास्तव जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचे व त्यांना देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करावे व तदनंतर अपिलार्थीस काही माहिती द्यावयाची राहिली असल्यास जन माहिती अधिकारी अपिलार्थीस तात्काळ नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवतील, याची दक्षता घ्यावी.ही कार्यवाही त्यांना तीस दिवसांचे आत करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती देण्याच्या संदर्भात वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य देतील,असे व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. काजी अजगरखॉं हयातखॉं, मु. पो. खंडाळा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामकिशन वाघजी माने, | : | अपीलकर्ता |
| मु. दाताडा (खु.), पो. दाताडा (बु.), तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| तलाठी, तलाठी कार्यालय, सजा सरकळी, तालुका जिल्हा हिंगोली | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामकिशन वाघजी माने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा सरकळी,ता.जि. हिंगोली - श्री. आर.एल.वाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी हिंगोली - प्रतिनिधी - श्री. ए.बी.पटवे, अ.का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तलाठी,सजा सरकळी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या सात मुद्यांवरील माहिती त्यांना दि. ०७.०९.२००९ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये ही बाब मान्य केली. तथापि ती माहिती चुकीची आहे, असे आयोगास सांगितले. नेमकी कोणती माहिती चुकीची आहे, याची आयोगाने विचारणा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे अपूर्ण माहिती मिळाली आहे, असे सांगितले.

१) त्रयस्थ पक्ष श्री. शंकर ग्यानुजी कऱ्हाळे यांना स्वतःच्या नावावरची व आईच्या नावावरची जमिन मुलाच्या नावे वाटणी करण्याचा अधिकार कोणत्या कायद्याप्रमाणे आहे, त्या कायद्याच्या छायांकित प्रती.

२) नमुना नं.९ च्या नोटीसच्या प्रती

याबाबत उपरोक्त क्र. १ च्या संदर्भातील माहिती तहसील कार्यालयाकडून तलाठी यांना प्राप्त करुन अपिलार्थीस द्यावी लागेल व क्र. २ च्या संदर्भात अशाप्रकारच्या नोटीसची प्रत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असेल तर त्यांना द्यावी लागेल. याबाबत तहसीलदार हिंगोली यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सरकळी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी. याबाबत तहसीलदार, हिंगोली यांनी व्यक्तिशः पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामकिशन वाघजी माने, मु. दाताडा (खु.), पो. दाताडा (बु.), तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सरकळी ता. जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गोपाल अरुण साहू,<br>रा. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गोपाल अरुण साहू - प्रतिनिधी - श्री. कचरुलाल साहू | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, हिंगोली - श्री. प्रशांत बिलोलीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८-०४-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०९-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे भूखंड क्र.२७६३/मो.र.क्रं.३६४/०४ सर्वे नंबर २ न.भू.प्लॉट क्र.१२ या भूखंडाच्या मोजणी केलेल्या कागदपत्रांची माहिती मागीतली आहे. मूळ अर्जामध्ये नमूद केलेला क्रमांक ४६४/०४ नसून ३६४/०४ असा आहे. ही बाब सुनावणीचे वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने मान्य केली.

जन माहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले की, संबंधित भूकरमापक श्री शिवभगत यांना या प्रकरणी मोजणीकरिता आदेश देण्यात आलेले होते. भूकरमापक यांनी माहिती दिली नसल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत व अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. तथापि, भूकरमापक यांनी मोजणीचे प्रकरण कार्यालयात जमा का केले नाही, याबाबतचा खुलासा दिनांक १८.०८.२००९ रोजीच्या ज्ञापनाद्वारे मागविण्यात आला. भूकरमापक यांनी संबंधीत भूखंड व मो.वि.३६४/०४ कार्यालयात दिनांक २७.०८.२००९ ला दाखल असल्याचे कळविले आहे. त्याची नोंद आवक नोंदवहीमध्ये आहे व आवक लिपीकाची स्वाक्षरी आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती कार्यालयात मिळत नसल्याचे सांगितले. यावर आज उपस्थित असलेले सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्वेच्छेने पुढाकार घेऊन नव्याने मोजणी करुन देण्याचे आयोगासमोर मान्य केले.

अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीने त्यांचे युक्तिवादात आयोगास सांगीतले की, हा भूखंड अपिलार्थीच्या ताब्यात आहे. तथापि या भूखंडावर काही प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. त्यास प्रथमदर्शनी तलाठी जबाबदार आहेत. सदर बाब आयोगास गंभीर वाटते. या सर्व प्रकरणात संचालक तथा जमाबंदी आयुक्त यांना चौकशी करावी लागेल व संबंधित अधिकारी /कर्मचारी दोषी आढळून आल्यास प्रशासकीय कार्यवाही करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवावी.

२) संचालक तथा जमाबंदी आयुक्त, भुमि अभिलेख यांनी या प्रकरणात वर नमूद केल्याप्रमाणे सविस्तर चौकशी करावी व संबंधित अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास पुढील प्रशासकीय कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०३-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोपाल अरुण साहू, रा. गाडीपुरा, मु.पो.ता.जि. हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक भूमी अभिलेख हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख,म.रा.,नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,विधानभवनासमोर,साधु वासवानी चौक,रेल्वेस्टेशनजवळ, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहंमद अब्दुल सलीम मो. अ. हकीम कुरेशी, पेन्शनपुरा मस्जिदच्या मागे, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, हिंगोली | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहंमद अब्दुल सलीम मो. अ. हकीम कुरेशी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लिपीक, न.प हिंगोली - श्री. विनय साहू | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, न.प हिंगोली - डॉ.प्रदिप ठेंगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०९-२००९ फेरसादर दिनांक १३-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात क्षेत्रीय अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेशित केले होते व दिनांक २१.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे. चौकशी अहवाल संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार अवैध बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात आली. या सर्व माहितीच्या प्रती दिनांक १६.१०.२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आल्या आहेत व अपिलार्थी यांनी त्याबद्दलची पोच दिली आहे.आयोगास उपलब्ध कागदपत्रावरुन ही बाब बरोबर असल्याचे आढळून येत आहे

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक : ०३-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल सलीम मो. अ. हकीम कुरेशी, पेन्शनपुरा मस्जिदच्या मागे, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मधुकर सखाराम थिट्टे, : अपीलकर्ता
रा. मकोडी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर सखाराम थिट्टे | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) सेनगाव - श्री.एस.सी.पाचपुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने दिनांक ४.२.२००९ च्या मूळ अर्जान्वये माहे नोव्हेंबर २००८ मध्ये केरोसिन उचलबाबत मोघम स्वरुपाची माहिती मागितली आहे ती माहिती त्यांना देता आली नाही. तथापि आयोगापुढील कागदपत्रावरुन आढळून येत आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ६.४.२००९ रोजी निर्णय पारीत केला असून अपिलार्थीस ८ दिवसात तात्काळ माहिती देण्यात यावी असे म्हटले आहे.या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी अपिलार्थीस माहिती देणे आवश्यक ठरत आहे व ती

त्यांना द्यावी लागेल. तथापि मागणी केलेल्या माहितीचे मोघम स्वरुप पाहता नोव्हेंबर २००८ बाबतची केरोसिन स्टॉक रजिस्टरची छायाप्रत ज्यामध्ये एकूण स्टॉक आवक व वितरण या बाबींचा तपशिल असेल अशी माहिती द्यावी लागेल.बीलबुक व केरोसिन बील या बाबींची मोघम स्वरुपाची माहिती मागितली असल्यामुळे देय होणार नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) सेनगांव यानी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीच्या छायाकिंत प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर सखाराम थिट्टे, रा. मकोडी, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, सेनगाव, जि. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साईनाथ मारोतराव पतंगे, : अपीलकर्ता
शहरपेठ ब्राम्हणगल्ली, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, वसमत, तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

प्रकरणात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिति अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिति आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साईनाथ मारोतराव पतंगे, शहरपेठ ब्राम्हणगल्ली, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिति अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कृषि सहसंचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पुंजाजी कोंडबा पतंगे,<br>मु. पो. येहळेगांव (तुकाराम), तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पुंजाजी कोंडबा पतंगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, कळमनुरी, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली - श्री. अविनाश महादेव शिंगटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोग नोंद घेत आहे. पुढील सुनावणीस त्यांना उपस्थित राहणे आवश्यक राहील.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एक महिन्यापूर्वी मिळाली आहे. तथापि ही माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात दोन दिवस निश्चित करुन त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. तसेच या व्यवस्थेबाबतची लेखी कल्पना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात दोन दिवस (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून काही आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी.सदर व्यवस्थेबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे. ही सर्व प्रक्रिया हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पुंजाजी कोंडबा पतंगे, मु. पो. येहळेगांव (तुकाराम), तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागोराव तुकाराम तरटे, : अपीलकर्ता
रा. वडगांव त.ज. पो. जवळा पांचाळ, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव त. जवळा, पांचाळ,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नागोराव तुकाराम तरटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगाव त.ज.,पो. जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली -श्री. ए. पी.बिचकुले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली - श्री. बी.डी.पट्टेवाले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | १८-०३-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२०१० (फेरसादर दिनांक १५.१२.१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी ग्रामपंचायत वडगाव त.ज.अंतर्गत घर नं. ८०,८१ च्या बांधकामाबाबत एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. कारण या घरावरील जमिनीवर अतिक्रमण झालेले असून त्यांच्या वहिवाटीचा रस्ता कमी झालेला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, संबंधित ग्रामसेवक यांच्याकडून ही माहिती देण्यात आलेली नाही. आज रोजी नव्याने रुजू झालेले ग्रामसेवक उपस्थित आहेत व त्यांनी घर नं.८१ बाबतची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध करुन घेतली आहे व ती ते अपिलार्थीस देऊ शकतात. ती माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी घर क्र.८० व ८१ या दोन घरांबाबत माहिती मागितली आहे. त्या माहितीच्या संदर्भात जी माहिती मागितली आहे, ती त्यांना देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांना द्यावी लागेल व ही बाब गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कळमनुरी यांना पहावी लागेल. अपिलार्थी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, यासंदर्भात जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे वेळोवेळी आदेश असूनही त्यांना या प्रकरणी न्याय मिळालेला नाही. ही बाब विचारात घेता या द्वितीय अपिलासंदर्भात अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस मिळेल, याची खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना करावी लागेल. अपिलार्थी त्यांना माहिती प्राप्त झाल्यावर त्या माहितीच्या आधारे नियमानुसार पुढील कार्यवाही करु शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.या आदेशाची अंमलबजावणी विहित मुदतीत होईल, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी व्यक्तिशः लक्ष द्यावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागोराव तुकाराम तरटे, रा. वडगांव त.ज.पो. जवळा पांचाळ, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडगाव त.ज.,पो. जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रकाश तुळशीराम पंडित,<br>जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली - श्री.एम.एस. पेरके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री.आर. यु. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि. ०७.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली आहे व माहिती प्राप्त झाल्याची पोच अपिलार्थीकडून प्राप्त झालेली आहे. आयोगापुढे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर

सुनावणी घेतली असून दि. १६.११.२०१० रोजी निर्णय दिला आहे. या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. अपिलार्थीस यापूर्वी माहिती दिली असल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी आज रोजीच्या सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेता आली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश तुळशीराम पंडित, रा.जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सौरभ अन्साजी आडकिणे, : अपीलकर्ता

व्दारा, पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थ नगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

मुख्याध्यापक, विश्वशांती ज्ञानपीठ विद्यालय, राहाटी, तालुका जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, विश्वशांती ज्ञानपीठ विद्यालय,रहाटी, ता.जि.परभणी - श्री. जैन बी. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.परभणी - प्रतिनिधी - श्री. एन.जे.ठाकूर, उपशिक्षणाधिकारी (मा) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी याचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगास अवगत केले की, विश्वशांती ज्ञानपीठ विद्यालय,राहाटी, ता.जि.परभणी हे खाजगी विद्यालय असून त्यास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. हे गुरुकुल पध्दतीचे विद्यालय आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने

संबंधित विद्यालयास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान नाही व ते संपूर्णपणे खाजगीरित्या चालविले जात आहे, फक्त सदर विद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता आहे, असे सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले.

उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोगास आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यापैकी मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोलीशी संबंधित असून उर्वरित माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाशी संबंधित असल्याचे दिसून येत आहे.

मुख्याध्यापक, विश्वशांती ज्ञानपीठ विद्यालय, राहाटी यांनी आज त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत प्राप्त झाली नाही, असे सांगितले व ती बाब योग्य आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज शिक्षणाधिकारी (मा.), जि.प. परभणी यांच्याकडे केलेला आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, परभणी यांना एक विशेष बाब म्हणून हे प्रकरण हाताळावे लागेल. त्यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ संदर्भातील पत्राची त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच अपिलार्थीस संपर्क साधून प्रकरणाची सद्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न करावा व अपिलार्थी यांनी मागितलेली सर्व माहिती एकत्रित करुन जन माहिती अधिकारी या नात्याने उपशिक्षणाधिकारी (मा.), जि.प.परभणी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा),जि.प.परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सौरभ अन्साजी आडकिणे, व्दारा, पातेकर ॲटोमोबाईल्स, सिध्दार्थ नगर, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. मुख्याध्यापक, विश्वशांती ज्ञानपीठ विद्यालय रहाटी, ता.जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.), जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामचंद्र दाजिबा खिल्लारी,<br>खिल्लारी मंदिराजवळ, गोरेगांव, तालुका सेनगांव,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक (आरोग्य सेवा), अकोला मंडळ, अकोला | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, आरोग्य सेवा, पुणे - ०१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामचंद्र दाजिबा खिल्लारी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक (आरोग्य) कार्यालय, अकोला मंडळ, अकोला- श्री. पी.जी. मालचे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (आरोग्य),अकोला मंडळ, अकोला | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असून ते अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. आज सुनावणीच्यावेळी आयोगाचे सूचनेनुसार अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली.अपिलार्थी यांनी ती

स्वीकारली. प्राप्त माहितीची अपिलार्थी यांनी प्रथम पहाणी करावी. यात काही अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे. पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी लागेल.

अतः आयोगाचे स्तरावर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामचंद्र दाजिबा खिल्लारी, खिल्लारी मंदिराजवळ, गोरेगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक (आरोग्य सेवा), अकोला मंडळ, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (आरोग्य सेवा), अकोला मंडळ,अकोला यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस महासंचालक, मुंबई | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली - श्री. एम.एस.पेरके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री. आर.यु. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २०.१०.२०१० रोजीच्या अर्जान्वये श्री साई सेवा गॅस एजन्सीने अपिलार्थीविरुध्द केलेल्या पोलीस कारवाईबाबत काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने हा अर्ज पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या कार्यालयाकडे केला होता. त्या कार्यालयातील संबंधित माहिती अधिकाऱ्याने सदर माहिती पोलीस

अधीक्षक,हिंगोली कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठविला आहे. तथापि या अर्जाद्वारे त्यांनी जी माहिती मागितली आहे, तिच माहिती त्यांनी त्यांच्या अन्य माहिती अर्जाद्वारे विविध अधिकाऱ्यांकडून जसे - विशेष पोलीस महानिरीक्षक,नांदेड, पोलीस अधीक्षक,हिंगोली, उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत इत्यादींकडून मागितलेली आहे. त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना यापूर्वीच दिलेली असल्याचे सांगितले. ही बाब आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या अपील क्र.३०५/२०११ व क्र. ३०६/२०११ प्रकरणात आयोगाने दि.०४.०३.२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला असल्यामुळे व या तीनही प्रकरणातील अपिलार्थीचा माहितीचा अर्ज एकच असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नव्याने विचार करण्याची आवश्यकता नाही, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. घनशाम रामनारायण भुतडा, : अपीलकर्ता
मु. पो. सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,
तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगांव,
तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - डॉ. घनशाम रामनारायण भुतडा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव,जि.हिंगोली - श्री. मनोज लोखंडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव,जि.हिंगोली - श्री. आर.बी.बुरुड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०५-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती आज त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यानुसार अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असे आयोगातर्फे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात आले. अपिलार्थी यांनी प्रथम या माहितीची पहाणी करावी. त्यामध्ये त्यांना काही त्रूटी आढळल्यास

पंधरा दिवसांचें आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल.तदनंतर त्यावर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने बरोबर माहिती पुढील पंधरा दिवसांचे आत द्यावी लागेल. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी लागेल.

अतः आयोगाचे स्तरावर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. घनशाम रामनारायण भुतडा, मु. पो. सेनगांव, तालुका सेनगांव, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय पोलीस अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली - श्री. एम.एस.पेरके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री. आर.यु. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २०.१०.२०१० रोजीच्या अर्जान्वये श्री साई सेवा गॅस एजन्सीने अपिलार्थीविरुध्द केलेल्या पोलीस कारवाईबाबत काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने हा अर्ज विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र कार्यालय, नांदेड यांच्याकडे केला होता. त्या कार्यालयातील माहिती अधिकाऱ्याने सदर माहिती

पोलीस अधीक्षक,हिंगोली कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठविला आहे. तथापि या अर्जाद्वारे त्यांनी जी माहिती मागितली आहे, तिच माहिती त्यांनी त्यांच्या अन्य माहिती अर्जाद्वारे मागितलेली असल्याचे व त्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना यापूर्वीच दिलेली असल्याचे आयोगास अवगत केले. ही बाब आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या अपील क्र.३०५/२०११ प्रकरणात आयोगाने दि.०४.०३.२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला असल्यामुळे व या दोनही प्रकरणातील अपिलार्थीचा मूळ अर्जातील मजकुर एकच असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणात नव्याने विचार करण्याची आवश्यकता वाटत नाही, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अमीर भिकाजी गारवे,<br>मु. पो. गारमाळ, ता. जि. हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>आस्थापना विभाग, नगर परिषद, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा लिपीक, नगर परिषद, हिंगोली - श्री. आनंद दायमा | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली- डॉ. प्रदीप ठेंगल | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २९-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दि. २९.०६.२०१० रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे. ती माहिती अपिलार्थी यांनी स्वीकारली असून त्याची पोच उपलब्ध आहे. पोच देताना अपिलार्थी यांनी, सदरील माहिती मिळाली परंतु समाधानकारक मिळाली नाही, असे मोघम नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर

परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. २०.०७.२०१० रोजी निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जान्वये ज्या मुद्यांवर त्यांचे समाधान झाले नाही, त्यावर पंधरा दिवसांच्या आत माहिती विनामूल्य देण्यात यावी. तथापि अपिलार्थी यांना प्रथम त्यांना नेमकी कोणत्या मुद्यांवर समाधानकारक माहिती मिळाली नाही, याबाबत जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,न.प. यांना स्पष्ट उल्लेख असलेले निवेदन पंधरा दिवसांचे आत द्यावे लागेल. यासाठी त्यांना एक संधी देण्यात येत आहे. ही कार्यवाही तीस दिवसांच्या आत जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, न.प. हिंगोली यांना करावी लागेल.

अतः आयोगाचे स्तरावर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अमीर भिकाजी गारवे, मु. पो. गारमाळ, वॉर्ड क्रमांक २, ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा आस्थापना लिपीक, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय पोलीस अधिकारी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली - श्री. एम.एस.पेरके | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली - श्री. आर.यु. जाधव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८-१०-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु), हिंगोली यांनी त्यांच्या दि. ०३.०३.२०११ रोजीच्या लेखी युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, मुद्दा

क्र.६ मध्ये खुलासा मागण्यात आल्यामुळे माहिती या व्याख्येत येत नाही व म्हणून देय नाही. तसेच इतर मुद्यांची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीचा मूळ अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,हिंगोली यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी अपिलार्थीस दोन वेळा संधी देऊनही अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. ही बाब आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर, उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असावी म्हणून अपिलार्थी सुनावणीस हजर झाले नाहीत, अशी नोंद घेऊन अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीने त्यांचा द्वितीय अपील अर्ज सादर करताना त्यामध्ये अपील दाखल करण्याचे कारण नमूद केलेले नाही. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. यास्तव आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर शिवाजी बोकारे,<br>व्दारा, राधाकृष्ण फोटो स्टुडिओ, ठक्कर्स बाजार, पहिला माळा, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>एम. डी., बाराशिव हनुमान सहकारी साखर कारखाना, जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक सह संचालक (साखर), नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी संचालक, बाराशिव हनुमान सहकारी साखर कारखाना, जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), जिल्हा हिंगोली- श्री. जी. एम. दशरथे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड - प्रतिनिधी - श्री. ए.यु.कुंडलवाडीकर, सहकार अधिकारी (श्रेणी - २) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०८-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३१-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, सदरचा साखर कारखाना सन १९९९ मध्ये कार्यान्वित झाला व सन २००६ मध्ये अवसायनात गेला आहे. पुढे तो भाडेतत्त्वावर पूर्णा साखर कारखान्यामार्फत चालविण्यात येत आहे व सध्या याद्वारे ऊस गाळप चालू आहे. पुढे त्यांनी आयोगास असेही

सांगितले की, या कारखान्यातील सर्व कर्मचाऱ्यांना पूर्णा साखर कारखान्याच्या व्यवस्थापनाकडे वर्ग करण्यात आले असून ते सध्या पूर्णा साखर कारखान्याचे काम करत आहेत. त्यामुळे जुनी कागदपत्रे हाताळत नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या जुन्या कागदपत्रांच्या माहितीच्या संदर्भात दि. २०.०८.२०१० रोजी किर्दनोंदवहीवरुन अपिलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये ट्रकच्या उसतोड विभागाच्या बीलाच्या तसेच बीलाच्या रकमेतील कमिशनच्या व डिपॉझीटच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय घेताना ही माहिती द्यावी लागेल, असा निर्णय दि. ३१.०७.२०१० रोजी घेतलेला आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे जुन्या कागदपत्रांमधून मागितलेल्या बीलाच्या सत्यप्रती शोधून काढण्यामध्ये अडचणी आहेत. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने यावर सहसंचालक (साखर) नांदेड यांना मार्ग काढावा लागेल, असे आयोगाचे मत आहे. यासाठी सर्व कायदेशीर बाबी पाहून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी या कारखान्यात नेमण्यात आलेल्या प्रशासक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेमार्फत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे संकलीत करुन अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. या कार्यवाहीसाठी आयोगातर्फे तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (साखर), नांदेड यांनी प्रशासक तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड यांचेमार्फत अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील याची व्यवस्था करावी. ही कार्यवाही तीन महिन्याच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर शिवाजी बोकारे, व्दारा, राधाकृष्ण फोटो स्टुडिओ, ठक्कर्स बाजार, पहिला माळा, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी संचालक, बाराशिव हनुमान सहकारी साखर कारखाना, जवळा बाजार, तालुका औंढा (नागनाथ), (सध्या पूर्णा सहकारी साखर कारखाना) जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख मुख्तारोद्दीन अजिजोद्दीन, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख मुख्तारोद्दीन अजिजोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा - नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,हिंगोली - प्रतिनिधी - श्री. ए.पी.वडवाळकर,अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली -श्री. भुसेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. याबाबत त्यांना दि. ०३.०८.२०१० रोजी कळविण्यात आले आहे, कारण की त्यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली होती. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले की, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २१.०९.२०१० रोजी निर्णय घेताना नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो) यांनी अपिलार्थीस चार दिवसांच्या आत व्यक्तिशः माहिती देण्यात यावी. तदनंतर जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २१.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून हस्तगत करावी, असे कळविले. तथापि अपिलार्थी उपस्थित न झाल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थी यांनी यासंदर्भात सांगितले की, ते तहसील कार्यालयात उपस्थित झाले तथापि त्यांना माहिती देण्यात आली नाही.

या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या पत्त्यावर ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख मुख्तारोद्दीन अजिजोद्दीन, पेन्शनपुरा,ता. जि. हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. खंडुजी भानुदास शितुळे, : अपीलकर्ता
रा. खरबी, पो. भांडेगांव, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. खंडुजी भानुदास शितुळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली - श्री. व्ही. एस. आकुलवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली - श्री. भुसेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी आज सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीस दि. २४.०९.२०१० रोजी विनामूल्य देण्यात आली आहे.ही माहिती एकूण ६३५ पृष्ठांची आहे. ती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली आहे, हे मान्य केले तथापि त्यांना अपूर्ण माहिती मिळाली, असे आयोगास सांगितले. ती खालीलप्रमाणे आहे.

१) अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील - खरबी येथील स्वस्त धान्य दुकानास परवाना मिळवताना आवश्यक असणाऱ्या व दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती - प्राप्त झालेल्या नाहीत.

अपिलार्थी यांनी पुढे असे सांगितले की, त्यांना एकूण २५०० प्रतींकरिता ` ५,०००/- भरण्याचे कळविण्यात आले आहे. त्यापैकी फक्त ६३५ पृष्ठांचीच माहिती देण्यात आली आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधित दुकानदाराकडून प्रथम २५०० पृष्ठांच्या माहितीकरिता शुल्क कळविण्यात आले होते. तथापि माहिती पुरवताना फक्त ६३५ पृष्ठे झाली. तसेच पुढे त्यांना ही माहिती विनामूल्य देण्यात आली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना खरबी येथील स्वस्त धान्य दुकानास परवाना मिळवताना दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती व परवाना मिळविण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडील शासननिर्णयाच्या/परिपत्रकाच्या छायाप्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. खंडुजी भानुदास शितुळे, रा. खरबी, पो. भांडेगांव, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अब्दुल मुबीन पि. मोहम्मद शिकूर बागवान, : अपीलकर्ता
रा. बागवानपुरा, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, हिंगोली

जन अपिलीय अधिकारी, :
तहसील कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हिंगोली - श्री. महंमद सरवर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली - श्री. एस. जी. भुसेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. ०२.११.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे व ती माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. याकरिता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून अभिलेखांची पहाणी करुन माहिती हस्तगत करुन घ्यावी, असे दि. १२.११.२०१० रोजी कळविले आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थी यांनी तहसीलदार, हिंगोली यांना दि. ०३.१२.२०१० रोजी झेरॉक्स प्रतींचा खर्च देण्यास तयार आहे व पूर्ण माहिती झेरॉक्स प्रतीमध्ये द्यावी, असे कळविले आहे. मूळ अर्जान्वये अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली आहे व माहिती विस्तृत स्वरुपाची

आहे. यामुळे कलम ७(९) खाली पहाणी देणे योग्य ठरत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहितीशी संबंधित अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन त्यातून त्यांना काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क देण्याची व्यवस्था करावी लागेल. या व्यवस्थेबाबतची कल्पना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे एक दिवस निश्चित करुन (स.११.०० ते सायं.०५.००) पहाणीसाठी विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती अधिनियमातील तरतुदीनुसार सशुल्क उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी. सदर व्यवस्थेबाबत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल मुबीन पि. मोहम्मद शिकूर बागवान, रा. बागवानपुरा, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गणपत रामकृष्ण लोंढे,<br>रा. रिसाला बाजार, गणेशवाडी रोड, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणपत रामकृष्ण लोंढे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली - श्री. ए.एस.लांडेपाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली - श्री. बी. ए. वाडेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०६-२००९ (फेरसादर दि. १०-०२-१०) |

प्रस्तुत द्वितीय अपील प्रकरणात यापूर्वी दि. १९.०१.२०११ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने प्रकरणातील सद्यस्थिती आयोगापुढे सादर करण्यासाठी सुनावणी पुढे ढकलण्याची आयोगास विनंती केली होती. त्यांच्या विनंतीनुसार सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०४.०३.२०११ रोजी हिंगोली येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशनाबाबत वेगवेगळया शासन निर्णयाबाबत एकूण सहा मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे.ती अद्याप

त्यांना मिळाली नाही. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. त्याप्रमाणे ती अपिलार्थीस त्वरित द्यावी लागेल.

यास्तव जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत उपलब्ध असलेल्या सर्व शासन निर्णयाच्या प्रती जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देतील असे जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांना पहावे लागेल. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात काही अपुरी माहिती आढळल्यास पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस बरोबर माहिती द्यावी लागेल.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी लागेल.माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस पाठवावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली हे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, याची जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांनी खातरजमा करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत रामकृष्ण लोंढे, रा. रिसाला बाजार, गणेशवाडी रोड, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म),जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दांडेगांवकर प्रदीप दामोधरराव,<br>धरमकाट्याजवळ, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दांडेगांवकर प्रदीप दामोधरराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०५-२००९<br>(फेरसादर दि. १८-०१-१०) |

प्रस्तुत द्वितीय अपील प्रकरणात यापूर्वी दि. १९.०१.२०११ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित होते. त्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. प्रकरणात आज दि. ०४.०३.२०११ रोजी हिंगोली येथे सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांनी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना/समज त्यांचे स्तरावर देण्यात याव्यात.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या सेवेशी संबंधित एकूण पाच मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"1) माध्यमिक शिक्षण सेवक भरती संबंधी प्रदीप दा.दांडेगावकर यांचा तक्रार अर्ज दि. 15/3/08 व 20/5/08 नुसार तक्रारीत तथ्य आहे का? तक्रारीनुसार केलेली कार्यवाही संचिकेी प्रती, विलंबाी कारणे. साक्षांकीत प्रतीसह मिळणे.(2) सोबत जोडलेला तक्रार अर्ज दि. 15/11/2007 व 22/5/08 नुसार शिक्षण विभागातील अनियमितता च्या अनुषंगाने केलेली कार्यवाही साक्षांकीत प्रतीसह मिळणे. (3) श्रीमती जाधव एस.के. यांचा अर्ज दि. 17/3/08 व (4) प्रदीप दांडेगावकर यांचा अर्ज दि.14/10/08 नुसार केलेली कार्यवाहीची साक्षांकीत प्रती.(5) जाधव वामन नामदेव यांनी माहिती अधिकारात मागितलेली माहितीच्या या कार्यालयासी अर्ज प्राप्त दि.30/5/085 चे दोन व दि. 9/9/08 चा एक चे अनुषंगाने संबंधितास दिलेली माहितीची पोहच व माहितीची साक्षांकी प्रती मिळणे."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

सदर माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, दि. १३.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.हिंगोली यांच्याकडे त्यांनी प्रथम अपील सादर केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला नाही. आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दि. १६.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जास तब्बल दोन वर्षे एवढा प्रदीर्घ कालावधी होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही. याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.हिंगोली श्री. जगताप व या माहितीशी संबंधित त्यांचे कार्यालयातील त्यांचे सहकारी अधिकारी/कर्मचारी संयुक्तपणे शास्तीस पात्र ठरत आहेत. त्यांना अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार एकत्रित ` २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये,याबाबतचा एकत्रित खुलासा त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोलीमार्फत आयोगाकडे सादर करावा लागेल. सदर आदेशाच्या प्रती सर्व संबंधितांना तामिल करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.हिंगोली यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) अपिलार्थी अद्यापपर्यंत माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी/कर्मचारी यांना एकत्रित ` २५,०००/-शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.हिंगोली यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर तत्कालीन सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर तामिल करावयाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली यांची राहील.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दांडेगांवकर प्रदीप दामोधरराव, धरमकाट्याजवळ, नांदेड रोड, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

श्री. तुळशीराम बसमाली वाघमारे, : अपीलकर्ता
रा. बेलथर, पो. येलकी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलथर,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तुळशीराम बसमाली वाघमारे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बेलथर, पो. येलकी,ता. कळमनुरी,जि.हिंगोली - श्री. एस.यु.बागुल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली - श्री.बी. डी. पट्टेवाले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २००३ च्या फेर आकारणीमध्ये श्री. दयानंद चट्टे यांना सरकारी भूखंड वाटपासंदर्भातील कागदपत्रांची तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही कागदपत्रे उपलब्ध आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात मूळ दस्तऐवज पहाणी करण्याकरिता ते जाण्यास

तयार असूनही ते तसे पहाणीसाठी उपलब्ध करुन देत नाहीत तसेच त्यांना देण्यात आलेल्या माहितीच्या प्रती वाचनीय नाहीत.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पहाणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन त्यातील काही आवश्यक कागदपत्रे वाचनीय स्वरुपात छायांकित करुन देतील अशी व्यवस्था करतील असे पहावे लागेल.सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.ही बाब अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पहाणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन त्यातील काही आवश्यक कागदपत्रे वाचनीय स्वरुपात छायांकित करुन देतील अशी व्यवस्था करावी.सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे.ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तुळशीराम बसमाली वाघमारे, रा. बेलथर, पो. येलकी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, बेलथर, पो. येलकी,ता. कळमनुरी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोहर शिवरामजी सुडके, : अपीलकर्ता
जिजामाता नगर, आदर्श कॉलेजचे पाठीमागे, हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप विभागीय अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर, तालुका मंगरुळपीर, जिल्हा वाशीम

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर, तालुका मंगरुळपीर, जिल्हा वाशीम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनोहर शिवरामजी सुडके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर,जि.वाशिम - श्री. एस.टी.सुर्वे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर, जि.वाशिम | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९-०१-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांनी दि. ०४.०९.२०१० रोजी शेलु खूर्द येथील त्यांचा भूखंड स.नं. ३६-१ सुडकेनगरचे ले-आऊट बाबत चौकशी करणेबाबत केलेला अर्ज व त्यासंदर्भात एकूण तीन मुद्यांवर माहिती मागितली आहे. ती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१०.२०१० रोजी निर्णय

पारित करुन जन माहिती अधिकारी यांना पुन्हा अभिलेखांची पहाणी करुन त्यांना माहिती देण्याबाबत सूचित केले आहे. तथापि आजही या प्रकरणासंदर्भात अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित संचिका उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी अ.का.(म) श्री. पाचरणे यांच्याकडे आहे व त्यांच्याकडून ही कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. अपिलार्थी हे स्वतःच्या भूखंडाबाबत माहिती मागत असून प्रकरण अतिक्रमण तसेच शासनाच्या मोकळया जागेवर बेकायदेशीर बांधकाम व शासनाची जमीन विक्रीसंबंधी आहे. अपिलार्थीस ही माहिती देय होत आहे. या प्रकरणात त्यामुळे जिल्हाधिकारी, वाशिम यांचे आयोग लक्ष वेधत आहे व त्यांनी व्यक्तिशः अपिलार्थीस देय असलेली माहिती संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून देण्यात येईल, याची खातरजमा करावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, वाशिम यांनी वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी त्याचप्रमाणे उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर, जि. वाशिम हे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवतील, याची स्वतः खातरजमा करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर शिवरामजी सुडके, जिजामाता नगर, आदर्श कॉलेजचे पाठीमागे, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय,मंगरुळपीर, जि. वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,मंगरुळपीर, जि. वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत
भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे,<br>रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, वसमत, तालुका वसमत,<br>जिल्हा हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली - श्री. फुफाटे डी.डी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली - श्री. अनिल माचेवाड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण १३ मुद्यांवरील माहितीपैकी काही माहिती त्रयस्थ पक्ष - मौ.महागाव येथील स्वस्तधान्य व केरोसिन परवानाधारक यांचेसंदर्भात माहे जानेवारी, २००९ ते जानेवारी, २०१० मध्ये वाटप केलेल्या धान्य व केरोसीन वाटपाबाबतची आहे. ती संबंधित त्रयस्थ पक्षाकडून संकलीत करुन घेण्यासाठी

उशिर झालेला आहे. ती आता उपलब्ध झाली असून ते अपिलार्थीस देऊ शकतात. अपिलार्थी यांना आज सुनावणीच्यावेळी ही माहिती देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. या माहितीची अपिलार्थी यांनी प्रथम पहाणी करावी. यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांचे आत कळवावे व त्यासंदर्भात तदनंतर पुढील पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती द्यावी लागेल.या प्रक्रियेबरोबर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते ०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस द्याव्या लागतील.

प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत अधिनियमातील कलम २०(१) अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वसमत यांच्यामार्फत खुलासा सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते ०५.००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील काही आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य द्याव्यात.

२) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,वसमत यांचेमार्फत आयोगास हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत खुलासा सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**हिंगोली**
**दिनांक ०४-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र हिरामण कनकुटे, रमाई, ए-९५७, अशोकनगर, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पाटील साहेबराव खंडोजी, : अपीलकर्ता
मु. पो. तुळजाभवानी मंदिराजवळ, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पाटील साहेबराव खंडोजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,कळमनुरी,जि.हिंगोली - श्री. के. आर. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - श्री. एस.आर.बलारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये एकूण दोन मुद्यांवर माहिती मागितली असल्याचे दिसून येते. त्यातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती उपअभियंत्यांच्या निवासस्थानाबाबतची आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्या वेळी सांगितले की, उपअभियंता यांचे निवासस्थान म्हणून कोणतेही निवासस्थान कळमनुरी येथे नाही. त्यामुळे या मुद्यासंदर्भातील माहिती 'निरंक' आहे. ही बाब त्यांना अपिलार्थीस कळवावी

लागेल. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ बाबत आज सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेमध्ये अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, त्यांना दि.०१.०४.२००८ ते ३१.०३.२०१० या कालावधीसाठी प्राप्त कार्यालयीन निधीबाबतची माहिती अपेक्षित आहे. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. त्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयातील बिलाच्या प्रती द्याव्या लागतील.

त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास विलंब झाला आहे. याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यांना संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशासह कार्याकारी अभियंता यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीसंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना देण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशासह कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत खुलासा हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**हिंगोली** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०४-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील साहेबराव खंडोजी, मु. पो. तुळजाभवानी मंदिराजवळ, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,<br>रा. उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय,<br>उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.जी. भाकसखेडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.०२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. २६.१२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्रथमतः दि.

२३.०१.२००९ व नंतर दि.११.०२.२००९ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.०३.२००९ रोजी सुनावणी घेऊन दिलेल्या निर्णयामध्ये, अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे तथापि तीन मुद्यांची माहिती पंधरा दिवस उशीरा दिली आहे, असे नमूद केलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थी यांनी एकूण दहा मुद्यांवर विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे व ती वेळेत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस उशिरा माहिती दिली असल्याचे त्यांचे अभिप्राय दिले असले तरीही यामध्ये जन माहिती अधिकारी यांची कोणतीही असद्‌भावना असल्याचे आयोगास दिसून येत नाही. यास्तव अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा.दबीरपुरा ता. उदगीर, जि.लातूर-४१३५१७

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,<br>रा. उदगीर, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी<br>नगर परिषद कार्यालय,<br>उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर - श्री. एस.जी. भाकसखेडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०४.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दि. ३१.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती दि.

०९.०३.२००९ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी एकूण तेरा मुद्यांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना काही मुद्यांवरील माहिती अपुरी दिल्याचे नमूद करुन यासंदर्भात माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यात यावी व माहिती देण्यासाठी सात दिवसांचा उशीर झाला आहे, असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी तदनंतर दि. ११.०५.२००९ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. माहिती देण्यामध्ये अल्पसा विलंब झाला असल्याचे दिसून येत असले तरीही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला असल्याचे व विलंबाने माहिती देण्यामध्ये त्यांची कोणतीही असद्‌भावना असल्याचे आयोगास दिसून येत नाही.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा.दबीरपुरा ता. उदगीर, जि.लातूर-४१३५१७

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजकुमार शिवाजीराव कदम, : अपीलकर्ता
रा. वाढवणा बु. ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर - सौ. मंदा मुकुंदराव गर्जे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०९.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मे. बाबा ट्रेडींग कंपनी, अर्धघाऊक केरोसिन विक्रेते व त्यांच्या अंतर्गत किरकोळ केरोसीन विक्रेते यासंबंधी काही माहिती मागितली

आहे. ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे संबंधित केरोसीन अर्धघाऊक विक्रेते व त्यांना जोडलेले इतर किरकोळ केरोसीन विक्रेते यांच्याकडे माहितीची मागणी करुनही प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस देता आली नाही. दरम्यान अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर तहसीलदार, उदगीर यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय घेतला होता. तथापि अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु) हे अपिलार्थीस देऊ शकले नाहीत, असे आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. आयोगासमोर अपिलार्थी यांचे दि. १५.०३.२०१० रोजीचे तहसीलदार,उदगीर यांना उद्देशून लिहिलेले पत्र असून त्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांच्या दि. ०९.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीची गरज नाही, तरी अर्ज निकाली काढण्यात यावा, अशी विनंती केल्याचे आढळून येत आहे. ही बाब जरी विचारात घेतली तरी अपिलार्थी यांच्या दि. ०९.०२.२००९ रोजीचा मूळ अर्ज व अपिलार्थी यांनी अर्ज निकाली काढण्यात यावा असे कळविणारे दि. १५.०३.२०१० रोजीचे पत्र, या एक वर्षाच्या कालावधीत तहसील कार्यालय, उदगीर ही माहिती प्राप्त करु शकले नाही, असे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या प्रकरणात संपूर्ण चौकशी होणे आयोगास आवश्यक वाटत असून या प्रकरणी जिल्हाधिकारी, लातूर यांना चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जिल्हाधिकारी, लातूर यांना प्रकरणात चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. राजकुमार शिवाजीराव कदम, मु.पो.वाढवणा बु. ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. साहेबराव पुंडलिकराव कराड, : अपीलकर्ता
रा. चिखली, ता.अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. साहेबराव पुंडलिकराव कराड | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.०२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०५.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २१.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळालेली नाही व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी दि. १३.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कळविले आहे की, त्यांनी प्रश्नार्थक माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांना देय

नाही. आयोगास ही बाब मान्य होत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांना देय होतात व ती माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) प्रश्नाधीन विषयाच्या (संचिका क्र. २००८/जमा/सि.आर./२२, दि. २३.१२.२००८ मोर नं.७८७/०८ मौ. केंद्रेवाडी, ता.अहमदपूर,जि.लातूर) निकालापूर्वी गैरअर्जदार यांना लेखी नोटीस दिली असल्यास त्या नोटीसच्या तामिल गोषवाऱ्याची प्रत.

२) सदर प्रकरणाचा निकाल ज्या लेखी पुराव्याआधारे व निकष लावून घेतला आहे, त्याच्या टिपणीची प्रत.

३) आर.ओ.आर. प्रकरणातील लिहिलेल्या रोजनाम्याची प्रत.

४) आर.ओ.आर. प्रकरणे संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कक्षेत चालविण्याची वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाच्या सत्यप्रत किंवा टिपणीची सत्यप्रत.

५) दि. ०७.०७.२००८ रोजी दिलेल्या कागदपत्रांवरुन घेतलेल्या निर्णयाची व टिपणीची सत्यप्रत.

६) शिकाऊ नायब तहसीलदार यांना अशा प्रकरणात निकाल देण्याकरिता प्राधिकृत करता येते किंवा कसे याबाबतच्या शासन परिपत्रक/निर्णयाची छायाप्रत.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती तहसीलदार यांना व्यक्तिशः लक्ष पुरवून अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल. त्याचप्रमाणे प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी सदरचा माहितीसाठीचा अर्ज व्यवस्थित हाताळला असल्याचे आयोगास दिसून येत नाही, याबाबत त्यांचा खुलासा प्राप्त करुन त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या दि. १९.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही. ही बाब आयोगास गंभीर वाटते. यासंदर्भात आयोगातर्फे जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त प्रत्येक प्रथम अपिलावर यापुढे अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय पारित केला जाईल, याची खबरदारी घ्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर जि.लातूर यांनी व्यक्तिशः लक्ष पुरवून अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवतील, याची दक्षता घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साहेबराव पुंडलिकराव कराड, मु.पो. चिखली, ता. अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सूर्यवंशी सुधाकर तुकाराम,<br>रा. लातूर. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - सूर्यवंशी सुधाकर तुकाराम | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.०९.२००७ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२०१० (फेरसादर) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी आज सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादाद्वारे आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या दि. ०६.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण १४ मुद्यांवर व्यक्तिश: माहिती मागितली होती. औरंगाबाद येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जन माहिती

अधिकारी यांनी दि. ०५.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना माहिती पाठविली ती अपूर्ण आढळून आली म्हणून उर्वरित माहिती त्यांना मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली.

आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. भविष्यात सुनावणीस जन माहिती व अपिलीय अधिकारी न चुकता उपस्थित राहतील, याबाबत श्री. डब्ल्यू. झेड. गंधारे, विद्यमान प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी त्यांना सूचना देण्यात याव्यात. तसेच या प्रकरणी प्राचार्यांना आयोगातर्फे असेही सूचविण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली व त्यांना देण्यात आलेली माहिती याची तौलनिक पाहणी व्यक्तिशः करावी लागेल व अपूर्ण माहिती दिल्याचे आढळून आल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा घेऊन पुढील कार्यवाही योजावी लागेल. त्याचबरोबर संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन देतील व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करतील, असे पहावे लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

श्री. डब्ल्यू. झेड. गंधारे, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली व त्यांना देण्यात आलेली माहिती याची तौलनिक पाहणी व्यक्तिशः करावी व अपूर्ण माहिती दिल्याचे आढळून आल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांचा खुलासा घ्यावा. त्याचबरोबर संबंधित जन माहिती अधिकारी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन देतील व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायांकित करुन अपिलार्थीस विनामूल्य देण्याची व्यवस्था करतील असे पहावे. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे.ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी सुधाकर तुकाराम,द्वारा कोराळीकर निवास, वीर फकिरा चौक, खाडगाव रोड, लातूर - ४१३ ५१२.

२. जन माहिती अधिकारी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मेंडके शंकर तोलबा,<br>रा. तामसा, ता.हदगाव, जि.नांदेड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>हदगाव, जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मेंडके शंकर तोलबा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि.नांदेड- प्रतिनिधी - श्री. आर.डी. जोंधळे, विस्तार अधिकारी (उद्योग) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि.प.नांदेड - श्री. नईम कुरेशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३०७.२००९<br>(फेरसादर दि. १९.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना माहिती मिळाली आहे. तथापि ती अपूर्ण आहे. अपिलार्थी यांच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण दहा मुद्यांवर प्रश्न विचारल्याचे आयोगास आढळून येत आहे. यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देय होऊ शकते. याकरिता उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीमधील प्रश्नार्थक/खुलासेवजा माहिती वगळून इतर मुद्यांपैकी कोणती माहिती दिली आहे व कोणती देय आहे, हे पहावे लागेल व उर्वरित देय माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागितली आहे. यास्तव त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावे लागेल. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, परभणी या स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित आहे. तथापि आयोगाचे मत असे आहे की, प्रकरणास विलंब झाला आहे, त्यामुळे ही माहिती संबंधित कर्मचाऱ्याकडून मागवून घेऊन अपिलार्थीस हस्तांतरित करण्यासंदर्भात कार्यवाही करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली,वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय होणारी संपूर्ण माहिती संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन आयोगाचे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे तीस दिवसांचे आत अपिलार्थीस विनामूल्य पाठविली जाईल, असे पहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मेंडके शंकर तोलबा, वार्ड क्र. ६, समाज मंदिराच्या पाठीमागे, तामसा, ता.हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हदगाव, जि.नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद खाजा सय्यद मिरा, : अपीलकर्ता
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड - श्री. एस.व्ही. पार्डीकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड- श्री. अविनाश धोंडगे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आज त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. १७.०२.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भातील माहितीकरिता `

२०/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याबाबत दि. १३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि. ११.०५.२००९ रोजी सुनावणी घेऊन निर्णय देताना निदेश दिले आहेत की, दि. १८.०५.२००९ पर्यंत माहिती द्यावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०५.२००९ रोजी नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविली व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची पोच प्राप्त झाली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद खाजा सय्यद मीरा, रहेमान मंजील, घर क्र. ९-६-२२०, उमर कॉलनी मस्जीद समोर, देगलूर रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपीलकर्ता
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी,
परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १७.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०८.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपर जिल्हाधिकारी, परभणी अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१७.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, रा. मिलकॉर्नर, बसस्टॅण्डरोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर लक्ष्मणराव गिरी,<br>रा. उजनी (राधानगर), ता.औसा, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग यांचे कार्यालय,<br>औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उद्योग उपसंचालक (तांत्रिक),<br>विभागीय कार्यालय,औरंगाबाद - श्री. एस. जी. राजपूत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उद्योग सहसंचालक, औरंगाबाद<br>विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०७.०१.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०४.२००९<br>(फेरसादर दि.२१.०४.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी त्यांचे कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी होते तथापि त्यांच्या पदाचा अतिरिक्त संवर्गात समावेश झाल्यामुळे ते सध्या जिल्हा परिषद, लातूर येथे कार्यरत आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या सेवेशी संबंधित काही माहिती मागितली आहे ती त्यांना दि. २२.१२.२००८ रोजी देण्यात आली आहे. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०५.०१.२००९ निर्णय दिला आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. या निर्णयामध्ये, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली असून अपिलार्थी यांनी मान्य केल्याचे नमूद केले असल्याचे आढळून येत आहे.आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे केलेला युक्तिवाद तसेच आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर लक्ष्मणराव गिरी,द्वारा बाळू किसन गिरी, मु.पो.उजनी (राधानगर), ता.औसा, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उद्योग उपसंचालक (तांत्रिक), विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उद्योग सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सौदागर म. रफीक पाशामियॉ,<br>रा. वलांडी, ता.देवणी, जि.लातूर | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२०९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सौदागर म. रफीक पाशामियॉ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते.

यास्तव प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सौदागर म.रफीक पाशामियॉ, रा. वलांडी, ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, देवणी, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सलावद्दीन मैनोद्दीन शेख, : अपीलकर्ता
ढोकी रोड, प्लॉट नंबर (७), पुनर्वसन कळंब,
तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सलावद्दीन मैनोद्दीन शेख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ अधिकारी, पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद - श्री. एस. एस. भोसले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-११-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १५-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये एकूण सहा मुद्दयांवर माहिती मागितली आहे त्यापैकी मुद्दा क्रमांक १ बाबतची माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ६ या मुद्दयांची

माहिती तहसील कार्यालय कळंब यांच्याकडे आहे व तहसील कार्यालय कळंब यांच्याशी संपर्क साधून परस्पर घ्यावी असे अपिलार्थीस कळविले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना तहसीलदार कळंब यांच्याकडून माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दिनांक ०२-०२-२००९ रोजी निर्णय घेऊन वर नमूद केलेल्या उर्वरीत चार मुद्दयांची माहिती अपिलार्थीस आठ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय घेऊनही अद्याप-पावेतो अपिलार्थीस माहिती दिलेली नाही ही बाब गंभीर असून याची नोंद आयोग घेत आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना लक्ष द्यावे लागेल व तहसीलदार, कळंब यांच्याकडून माहिती प्राप्त करुन ती अपिलार्थीस विनामूल्य पाठवावी लागेल. या प्रकरणी तहसील कार्यालय कळंब यांच्या कार्यालयातील ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणात दुर्लक्ष झाले आहे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे शास्तीस पात्र ठरत आहेत. त्याकरिता तहसील कार्यालय कळंब यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी जन माहिती अधिकारी हे वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवतील याची व्यवस्था करावी.

२. तहसील कार्यालय कळंब यांच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सलावद्दीन मैनोद्दीन शेख, ढोकी रोड, प्लॉट नंबर (७), पुनर्वसन कळंब, तालुका जिल्हा

उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. प्रभाकर सखाराम गायके,<br>मु. पो. शिरढोण, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रभाकर सखाराम गायके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. डी. एच. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद<br>- सौ. शोभा ठाकूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १३-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये १९९२ सालातील श्री. रामकिसन आप्पा वाघमारे, रा. शिरढोण यांची जमीन सर्व्हे नंबर २१३/अ क्षेत्र ४ एकर बाबत कागदपत्रे मागितली आहे. ही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात पाहणी करुनही उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी जमीनमालकाच्या वारसांकडून (जमीनमालक मयत असल्यामुळे) दिनांक १४-०३-२०११ रोजी उपलब्ध करुन घेतली आहे. आज रोजी त्याचा एक संच त्यांच्याकडे उपलब्ध आहे व तो ते अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे तो अपिलार्थीस देण्यात आला व अपिलार्थी यांनी तो स्विकारला.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळंब यांनी दिलेल्या झेरॉक्स प्रती या प्रमाणित नाहीत व त्या त्यांना साक्षांकीत करुन देण्यात याव्यात. तथापि ही बाब मूळ संचिका कार्यालयात उपलब्ध झाल्यावरच शक्य होईल असे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सांगितले. ही बाब अपिलार्थीने मान्य केली. या सर्व बाबी विचारात घेता हे प्रकरण या स्तरावर बंद करण्यात यावे असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभाकर सखाराम गायके, मु. पो. शिरढोण, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. कुसूम महेंद्र सुकाळे, : अपीलकर्ता
रा. येरमाळा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद - श्री. डी. एच. राठोड | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद<br>- सौ. शोभा ठाकूर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०८-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००९ रोजी देण्यात आली आहे व त्याची पोच तहसील कार्यालयाच्या दस्तवेजामध्ये उपलब्ध आहे.

अपिलार्थी यांचे दिनांक १५-०३-२०११ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आज रोजी आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे विचाराधीन व्दितीय अपील क्रमांक १९१८/२००९ मागे घेत आहे. त्यामुळे ते खारीज करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. कुसूम महेंद्र सुकाळे, रा. येरमाळा, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळूंके, : अपीलकर्ता
शिवछत्रपतीनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

१ अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१९

२ सुनावणीची तारीख दि. १६-०३-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद
- श्री. आर. ए. जाधव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,
तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २८-०५-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २९-०६-२००९

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-०९-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २८-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या पाच मुद्दयांवरील माहितीपैकी तीन मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०६-२००९ रोजी देण्यात आलेली आहे व उर्वरीत मुद्दा क्रमांक ४ ची माहिती खुलासेवजा / प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे देय होत नाही. मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती संबंधित त्रयस्थ पक्ष सुर्यकांत ॲण्ड कंपनीकडून दिनांक १८-०६-२००९ ला मागितली आहे तथापि ती प्राप्त झ ाली नाही त्यामुळे देता आली नाही. माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि उर्वरीत माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झ ेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळूंके, शिवछत्रपतीनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. कुलकर्णी संजय वसंतराव,<br>व्दारा, नगरपरिषद,<br>उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गावकामगार तलाठी सज्जा पाडोळी (आ),<br>तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गावकामगार तलाठी सज्जा पाडोळी (आ),<br>तालुका जिल्हा उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद - श्री. अरुण नारायण गोरे | : | उपस्थित |
| ३.४ | तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०६-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व तहसीलदार, उस्मानाबाद हे उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जी काही माहिती त्यांच्याजवळ उपलब्ध होती ती त्यांना देण्यात आलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०४-०३-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती द्यावी असा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दिनांक २४-०३-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. या माहितीपैकी विम्यासाठी दिलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्या पुरविता येत नाही असेही कळविलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक ३०-०३-२००९ रोजी सोयाबीन सर्व्हेबाबतची व फेर सर्व्हेबाबतची यादी (एकूण पाने ६५) अपिलार्थीस विनामूल्य देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी तहसीलदार यांना त्रयस्थ पक्षांच्या प्रमाणपत्राच्या प्रती मागितल्याचे दिसून येत आहे. या प्रती त्यांच्या कार्यालयात पुन्हा एकदा शोध घेऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कुलकर्णी संजय वसंतराव, व्दारा, नगरपरिषद, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी सज्जा पाडोळी (आ), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपीलकर्ता
माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर - श्री. डी. एन. शिंदे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर,<br>तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष श्री. बी. वाय. कांबळे, अर्धघाऊक केरोसीन विक्रेता, शिरुर ताजबंद | : | उपस्थित |
| ३.५ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर श्रीमती मंजुषा त्रि.लटपटे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०-०८-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-०८-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४-१०-२००८ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १३-०१-२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १५-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेल्या माहिती करिता प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे एकूण ५९२ रुपयांचा भरणा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा अहमदपूर मध्ये चलनाव्दारे करावा व माहिती हस्तगत करावी असे दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे ती विनामूल्य देण्यात यावी अशी अपिलार्थीने विनंती केली आहे. दिनांक १६-०९-२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी याबाबत अपिलार्थीस स्मरणपत्र पाठविले आहे. प्रथम अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी विहित मुदतीत न कळविल्यामुळे विनामूल्य माहिती द्यावी अशी आग्रही भूमिका घेतली यावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात यावी असा निर्णय प्रथम अपिलावर दिनांक ०४-१०-२००८ रोजी घेतला. त्याप्रमाणे दिनांक ०५-०१-२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात आली व याबाबतची पोचही अपिलार्थीने दिलेली आहे. आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. निंबरगे महेश शिवशंकर,<br>रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. निंबरगे महेश शिवशंकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद - श्री. राजकुमार माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली आहे तथापि ती काही प्रमाणात अपूर्ण आहे ती खालीलप्रमाणे आहे.

१. उमरगा न्यायालयाने अपर जिल्हाधिका-यांमार्फत मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती.

२. जानेवारी २००६ ते ०१ ऑक्टोबर २००८ या कालावधीतील पकडलेल्या कोणत्याही तीन रेशन दुकानांच्या धान्यसंदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या व न्यायालयाकडे सादर केलेल्या अहवालाच्या झेरॉक्स प्रती.

वरील दोन्ही मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात सांगितले की, उमरगा न्यायालय यांच्यामार्फत झालेला पत्रव्यवहार गोपनीय म्हणून झालेला आहे त्यामुळे सदरची माहिती देता आली नाही. यावर आयोगाने सूचित केले की, न्यायालयाचा अवमान होणार नाही ही बाब तपासून अपिलार्थीस सदर माहिती द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. निंबरगे महेश शिवशंकर, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शहाजी परशुराम पवार, : अपीलकर्ता
मु. पो. येवती, तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शहाजी परशुराम पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद - श्री. अरुण नारायण गोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. भांडे आर. बी. लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०२-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १२-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०४-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये दिनांक ०१-०१-२००४ ते ३१-१२-२००८ अशा पाच वर्षाच्या कालावधीतील १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर केलेले स्मरणपत्राचे टिपण, हक्कसोडपत्र, अदलाबदलपत्र, संमतीपत्र, संमतीने केलेले वाटणीपत्र व फेरफाराच्या नोंदी अशी उस्मानाबाद तालुक्यातील सर्व सजांची माहिती मागितली आहे व ती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अशा प्रकारच्या १०० रुपयाच्या स्टॅम्पपेपरवरील नोंदी काही बाबतीत मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाने मान्य केल्या असून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात पाच वर्षात सुमारे ५००० प्रकरणे निघू शकतात आणि इतकी मोठी विस्तृत प्रमाणावरील माहिती देणे शक्य होत नाही. याकरिता अपिलार्थी यांना आयोगातर्फे सुनावणीच्या वेळी सूचित करण्यात आले की, त्यांनी त्यांची मागितलेली माहिती स्वेच्छेने मर्यादित केल्यास त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) मधील तरतुदीनुसार ही कागदपत्रे त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे शक्य होईल. यावर अपिलार्थी यांनी स्वेच्छेने दिनांक ०१-०१-२००४ ते ०१-०१-२००६ या दोन वर्षाकरिता फक्त सजा नितळी येथील संपूर्ण प्रकरणे पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावीत असे सुचविले आणि ही बाब सुनावणीच्या वेळी मान्य करण्यात आली.

अतः जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झ ेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे अपिलार्थीस पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शहाजी परशुराम पवार, मु. पो. येवती, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. माळी नंदकुमार माणिक,<br>रा. कामठा, पो. आपसिंगा, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. माळी नंदकुमार माणिक | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. आर. ए. जाधव, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी - श्री. भांडे आर. बी., लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०१-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०३-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०४-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना यापूर्वी दिनांक २०-०४-२००९ रोजी देण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास अवगत केले की, त्यांना बी. पी. एल. कार्डधारकांची यादी मिळाली नाही ती देण्यात यावी. यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित गावामध्ये बी. पी. एल. कार्डधारक नाही कारण की, त्यांना अंत्योदय योजनेत वर्ग करण्यात आले आहे व आता ए. पी. एल. मध्ये १७४ कार्डधारक आहेत तथापि बी. पी. एल. मध्ये कोणीही कार्डधारक नाहीत तसे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कळवावे लागेल व अपिलार्थी यांना प्रशासनाकडे त्यांची नावे बी. पी. एल. मध्ये अंतर्भूत करण्यासाठी वेगळा स्वतंत्र अर्ज नियमानुसार करावा लागेल.

वरील पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे बी. पी. एल. कार्डधारकांबाबतची सद्यस्थिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १६-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. माळी नंदकुमार माणिक, रा. कामठा, पो. आपसिंगा, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मधुकर पंडितराव पाटील,<br>रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १६-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर पंडितराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत याची आयोग गंभीर दखल घेत आहे. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे आयोगाकडील सुनावणीसाठी कटाक्षाने उपस्थित राहतील याकरिता सर्वांना सूचित करणे आवश्यक राहील व याकरिता त्यांना कार्यवाही करावी लागेल.

अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात त्यांच्या दिनांक १३-०८-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना सन ऑक्टोबर २००६-०७ ते दिनांक ०१ एप्रिल २००८ या कालावधीतील उस्मानाबाद जिल्हयामध्ये ट्रॅक्टर, जेसीबीमार्फत शेततळी, कंम्पार्टमेंट बंडीग व इतर कामावर

झालेल्या खर्चाची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी दिलेली नाही. ही माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार देय होत आहे व ती द्यावी लागेल. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी ही माहिती अद्यापही अपिलार्थीस न दिल्यामुळे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना स्वतः या प्रकरणी स्वतः लक्ष पुरवावे लागेल व अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरवावी लागेल.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रोहयो हे कलम २० (१) अन्वये अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे शास्तीस पात्र ठरत आहेत. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

वरील पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवतील याची व्यवस्था करावी.

२. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना रुपये २५,००० इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १६-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर पंडितराव पाटील, रा. रोसा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनेश शिवलाल राठोड, : अपीलकर्ता
रा. अंबड, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मुख्याध्यापक, श्री. शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, राठोडनगर,शिवनी, ता.जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १८.०७.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये मुख्याध्यापक,

श्री. शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, राठोडनगर,शिवनी, ता.जि.जालना या शाळेसंदर्भात एकूण बारा मुद्यांवर शाळा सुरु झाल्यापासून एकूण २००९ पर्यंत फार मोठ्या प्रमाणात विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. या अर्जास प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, शिवनीतांडा, जि. जालना यांनी दि. ०४.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे एकूण २९८० पृष्ठांच्या माहितीसाठी `५,९६०/- इतके शुल्क भरणा करण्याकरिता त्याचप्रमाणे दि. ०४.०८.२००९ रोजीच्या दुसऱ्या पत्राद्वारे ३२३७ पृष्ठांच्या माहितीकरिता `६,४७४/- इतके शुल्क भरण्याकरिता कळविले आहे. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने केल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि. १४.०९.२००९ रोजी आदेश निर्गमित केल्याचे आढळून येत आहे. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते, असे आढळून येत आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपोटीचे एकूण `१२,४३४/- इतकी रक्कम असल्यामुळे तसेच संबंधित शाळेस कोणत्याही प्रकारचे आकस्मिक निधी शासन देत नसल्यामुळे त्यांच्याकडे झेरॉक्स काढण्यासाठी रक्कम उपलब्ध नाही. अपिलार्थी शाळेत उपस्थित राहून त्यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करु शकतात. या सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही उपस्थित असल्याचे तसेच त्यांनी ही बाब सुनावणीमध्ये मान्य केल्याचेही या निर्णयावरुन दिसून येत आहे. यास्तव जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनेश शिवलाल राठोड, सहजीवन नगर, विठ्ठल रुख्मिणी मंदिराजवळ, इंद्रप्रस्थ लॉजच्या मागे, अंबड नाका, जालना - ४३१ २१३.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, राठोडनगर,शिवनी, ता.जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख अहेमद शेख महमद,<br>रा. परतूर, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,परतूर,जि. जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, परतूर, जि. जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख अहेमद शेख महमद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परतूर, जि.जालना - श्री. एस.एस.शेट्टी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, परतूर, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १४.०८.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये परतूर तालुक्यातील गॅसधारकांबाबत सन २००४-२००९ या कालावधीतील विस्तृत व मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे.यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाशी संबंधित उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. १४.०८.२००९ रोजी देण्यात आली आहे व त्याच पत्रामध्ये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे की, उर्वरित माहिती मे. ज्योति गॅस एजन्सी या कार्यालयाशी संपर्क साधून हस्तगत करु शकतात. संबंधित गॅस एजन्सीने दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे भारत सरकारच्या या उपक्रमाच्या मुंबई कार्यालयाचा संपर्क पत्ता दिला आहे. ही बाब अपिलार्थीने सुनावणीमध्ये मान्य केली. यावर अपिलार्थी पुढील कार्यवाही करु शकतात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अहेमद शेख महंमद,रा. इंदिरानगर, परतूर वॉर्ड क्र.१, ता.परतुर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मदन रामदास गोरे,<br>रा. हातडी, ता.परतुर, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>लघुपाटबंधारे उपविभागीय कार्यालय, वाटुर फाटा,<br>ता.परतुर, जि.जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग, जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००८/रामाआ/अपील/सिआर/२४४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,<br>लघुपाटबंधारे उपविभाग वाटूर, जि. जालना- श्री. पी. डी. सानप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, जालना<br>लघुपाटबंधारे विभाग, जालना- श्री. सत्तारखॉन जमालाखॉन | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०२.२००८ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना दि.३०.१०.२००७ रोजी देण्यात आली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१२.२००७ प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही, ही बाब आयोगापुढील कागदपत्रांवरुनही दिसून येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जालना लघुपाटबंधारे विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करणे आवश्यक ठरत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जालना लघुपाटबंधारे विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. १३.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मदन रामदास गोर, मु.हातडी, ता.परतूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे उपविभाग वाटूर,जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जालना लघुपाटबंधारे विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दामोधर भिकाजी मदन, : अपीलकर्ता
रा. केळीगव्हाण, ता.बदनापूर, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. ०६.०७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, बदनापूर यांनी अपिलार्थीस पाठविलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १७.०७.२००९ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे की, त्यांना देण्यात आलेली माहिती अपुरी आहे व फेरफार संचिकेची

नक्कल त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बदनापूर, जि.जालना - जे कार्यालय प्रमुख आहेत - त्यांना याबाबीत लक्ष घालून अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १५.०५.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या फेरफार संचिकेची नक्कल त्यांना विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बदनापूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या फेरफार संचिकेची नक्कल त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दामोधर भिकाजी मदन, रा. केळीगव्हाण, ता.बदनापूर, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना तथा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बदनापूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिवाजी भाऊराव बनकर, : अपीलकर्ता
रा.बुटखेडा, ता.जाफ्राबाद, जि.जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना -श्रीमती व्ही. एस. शेडोळकर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.०३.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०५.२००९ (फेरसादर दि. १९.०१.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती (एकूण ४० पृष्ठे) त्यांना दि. २४.०२.२००९ रोजी व्यक्तिशः देण्यात आली आहे. माहिती मिळाल्याबाबतची अपिलार्थीची पोचस्वाक्षरी अपिलार्थी यांनी दिलेली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन ही बाब आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याच आढळून येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊराव बनकर, रा. बुटखेडा,पो. अकोला (देव), ता.जाफ्राबाद, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विनयकुमार रिखबचंद कोठारी,रा.जालना : अपीलकर्ता

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, नगर पालिका प्रशासन,
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी, नगर पालिका प्रशासन,
जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०८.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९.०३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०७.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथील नगर पालिका प्रशासन विभागाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २००६ च्या संदर्भात विविध उमेदवारासंबंधी एकूण तीन मुद्यांवर विस्तृत स्वरुपात माहिती झेरॉक्स

प्रतीमध्ये मागितली आहे. या माहितीकरिता ` १२००/- इतक्या शुल्काचा भरणा करावा, असे जन माहिती अधिकारी तथा निवडणूक प्रमुख, नगर परिषद, जालना यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. तथापि या पत्रासंदर्भात अपिलार्थीने त्यांच्या दि. २८.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा निवडणूक प्रमुख, नगर पालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना, त्यांनी विहित मुदतीत शुल्क न कळविल्यामुळे माहिती विनामूल्य देण्यात यावी, असे कळविले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे जन माहिती अधिकारी यांना निदेश आहेत की,त्यांना अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपिलार्थीस विनामूल्य द्याव्या लागतील.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा निवडणूक प्रमुख, नगर पालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विनयकुमार रिखबचंद कोठारी, (शहर अध्यक्ष काँग्रेस आय.) ऋषभ बंगला, शिवाजी पुतळा, जालना, ता.जि.जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा निवडणूक प्रमुख, नगर पालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी, नगरपालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अभयकुमार बलिराम यादव, : अपीलकर्ता
रा. जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ कार्यालय,जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ कार्यालय,जालना

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२.०९.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहे एप्रिल, २००८ ते मार्च, २००९ या कालावधीतील जिल्हयातील सर्व

तालुक्यातील सर्व कामांची कामनिहाय,एजन्सीनिहाय,उपअभियंतानिहाय, कनिष्ठ अभियंतानिहाय अशी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बदनापूर यांनी दि. २६.०५.२००९ रोजी अपिलार्थीस कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून विभागीय कार्यालयात उपलब्ध आहे. ती कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून त्याची पहाणी करु शकतात. यावर पुढे काय कार्यवाही झाली हे आयोगास अवगत होऊ शकले नाही. तथापि अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने नमूद केले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, परतुर व सार्वजनिक बांधकाम उपविभाग,मंठा या उपविभागाची कागदपत्रे पाहणी करण्यासाठी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. त्याप्रमाणे संबंधित उपविभागाची माहिती अपिलार्थीस आजपर्यंत पाहणीसाठी उपलब्ध करुन दिली नसल्यास, संबंधित जन माहिती अधिकारी यांना या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस एक दिवस (स.११.०० ते सायं.५.००) निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी लागतील व त्यातील काही आवश्यक कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल.

या सर्व पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अभयकुमार बलिराम यादव, लोकप्रश्न कार्यालय, रहेमानगंज, रामचंद्र आर्य चौक, जालना

२. जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ कार्यालय,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिलीप नामदेवराव गावंडे,<br>रा. आव्हाडा, ता.भोकरदन, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. रामराव गावंडे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, त्रयस्थ पक्ष स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. रामराव लक्ष्मण गावंडे यांच्या स्वस्त धान्य दुकान क्र. ५०/२ आव्हाना, ता.भोकरदन या स्वस्तधान्य दुकानाशी संबंधित सन २००६ ते २००९ या कालावधीतील

अंत्योदय, अन्नपूर्णा, बी.पी.एल. इ. च्या संदर्भात विस्तृत माहिती व्यक्तिशः मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. यासाठी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातील आवश्यक काही कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित सर्व अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन (स.११.०० ते सायं.५.००) उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील आवश्यक काही कागदपत्रे छायांकित करुन विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. सदर व्यवस्थेबाबतचे पत्र अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावे.ही प्रक्रिया आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप नामदेवराव गावंडे, मु.पो.आव्हाना, ता.भोकरदन, जि.जालना-४३१११४.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, भोकरदन, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नारायण उत्तमराव मते,<br>रा. देवहिवरा, ता.घनसावंगी, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, घनसावंगी, जि.जालना- श्री. पाटील आर.एम. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.०६.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२.०६.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.१०.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती तालुका कृषि

अधिकारी, घनसावंगी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे व मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती संबंधित तलाठी यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे व त्यांच्याशी संपर्क साधून माहिती हस्तगत करावी, असे त्यांच्याकडील दि. २३.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. संबंधित माहिती अपिलार्थीस मिळाली किंवा कसे, ही बाब आयोगास अवगत होऊ शकत नाही. तरी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांना तहसीलदार (कार्यालय प्रमुख) तहसील कार्यालय, घनसावंगी यांच्या मदतीने अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, यांनी तहसीलदार (कार्यालय प्रमुख), घनसावंगी यांच्या मदतीने अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण उत्तमराव मते, रा. देवहिवरा, ता.घनसावंगी, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, घनसावंगी, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राधेश्याम रामनाथजी काबरा,<br>रा. टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद,<br>जि.जालना | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राधेश्याम रामनाथजी काबरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी- ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना - श्री. पी.ए.तांबिले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, जाफ्राबाद, जि.जालना-प्रतिनिधी - श्री. के. एस. वनवे, विस्तार अधिकारी (पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.०९<br>(फेरसादर दि. १६.११.२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या मिळकतीसंदर्भात एकूण चार मुद्यांवर काही माहिती मागितली होती. ती त्यांना दि. १९.१२.२००८ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ती प्राप्त झाल्याचे सुनावणीच्यावेळी त्यांनी मान्य केले. तथापि त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे असे सुनावणीच्यावेळी सांगितले. यावर नेमकी कोणती अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती आहे, याची विचारणा आयोगाने केली असता, अपिलार्थी यांनी आयोगास खालील बाबी सांगितल्या.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे श्री. नंदकिशोर जुगलकिशोर काबरा व श्री. घनश्यामदास रामनाथ काबरा यांच्या दि.१०.०५.२००७ व १५.०५.२००७ च्या अर्जाच्या प्रती मागितल्या आहेत तथापि त्याऐवजी त्यांना दि.०१.०४.२००७ व ०३.०४.२००७ रोजीच्या अर्जाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे मुद्दा क्र.२ द्वारे मागितलेल्या माहितीतील दि. १५.०४.२००८ रोजीच्या ग्राम पंचायत मिटींगच्या इतिवृत्तांताची प्रत व फेरफार क्र. २३९ व २४० ची प्रोसिडींगची नक्कल मिळाली नाही.

वरील दोन मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल. त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांना अपिलार्थीने मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेल्या माहितीमध्ये तफावत का पडली, याची चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास कार्यवाही करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील अद्यापि अपिलार्थीस न दिलेली, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती त्यांना हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांनी अपिलार्थीने मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती व त्यांना देण्यात आलेल्या माहितीमध्ये तफावत का पडली, याची चौकशी करुन संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास त्यासंदर्भात पुढील कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राधेश्याम रामनाथजी काबरा, मु.पो. टेंभूर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना-४३१ २०८.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), पंचायत समिती, जाफ्राबाद, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नागनाथ तुकाराम भुमरे, : अपीलकर्ता
मौलाना आझादनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
प्रमुख लिपिक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रमुख लिपिक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी - सौ. आशा श्रीधर दिक्षीत | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू,<br>जिल्हा परभणी - सौ. (डॉ.) चारुशीला ल. पंडित | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०-०२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>१०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ११-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये नगर परिषद सेलू यांच्या मालकीच्या भाड्याने दिलेल्या जागेबाबत व विविध ठिकाणी विनापरवानगी झालेल्या बांधकामाबाबत तसेच विविध खर्च याबाबत विस्तृत स्वरुपाची एकूण १३ मुद्दयांवर माहिती मागितली होती. ही माहिती एकत्रित करण्यास त्यांना काही कालावधी लागला तथापि अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिनांक २४-०२-२००९ रोजी देण्यात आली आहे व अपिलार्थी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहून ही माहिती प्राप्त केलेली आहे व सदरील संपूर्ण माहिती मिळाल्याची पोच दिली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नागनाथ तुकाराम भुमरे, मौलाना आझादनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नारायणराव तातेराव कदम,<br>शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायणराव तातेराव कदम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०३-२००९<br>फेरसादर दिनांक ०४-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही तसेच त्यांनी दिनांक ३०-१२-२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे

प्रथम अपील दाखल केले असता या प्रथम अपिलावरही सुनावणी घेतली नाही. प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही ही बाब आयोगास गंभीर वाटते.

या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायणराव तातेराव कदम, शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. घुगे शिवशंकर नामदेवराव,<br>ग्रामपंचायत सदस्य, केहाळ, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,<br>परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०५-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १९-०६-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २९-०८-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०९-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत याची गंभीर दखल

आयोगाने घेतली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना याची नोंद घ्यावी लागेल व आयोगाकडील सुनावणीस आपल्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे न चुकता उपस्थित राहतील याची व्यवस्था करावी लागेल.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १५-०५-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये SGRY २००७-०८ अंतर्गत झालेल्या कामाचे अंदाजपत्रक, एम. बी. झेरॉक्स, तसेच बाराव्या वित्त आयोग निधी बाबत सविस्तर माहिती मागितल्याचे आढळून येत आहे. तसेच आयोगापुढील कागदपत्रावरुन असेही दृष्टोत्पतीस येत आहे की, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केहाळ, तालुका जिंतूर जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००९ रोजी कळविले आहे की, त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील कुठलेच अभिलेखे पदभारात न मिळाल्याने ते सदरील माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाही, ही बाब गंभीर आहे. बदलीनंतर ग्रामसेवकाने दस्तवेज ग्रामपंचायत कार्यालयात बदलून आलेल्या ग्रामसेवकाकडे देणे आवश्यक आहे याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे व अपिलार्थीस माहिती मिळेल याची त्यांना व्यवस्था करावी लागेल आणि संबंधित जबाबदार अधिकारी कर्मचारी यांच्याविरुध्द कार्यवाही योजावी लागेल.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी यथोचित कार्यवाही करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. घुगे शिवशंकर नामदेवराव, ग्रामपंचायत सदस्य, केहाळ, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, मु. पो. पाथरी (इंदिरानगर) पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (म.), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी - श्री. एस. डी. मांडवगडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०६-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १९-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २९-०७-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-१०-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी परभणी जिल्ह्यातील सरकारी गायरानावरील अतिक्रमणे नियमानुकुल करण्याच्या कार्यवाहीबाबत सन २००४-०५ ते २८ फेब्रुवारी २००९ पर्यंत सहा मुद्दयांवरील माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना प्राप्त झाली आहे तथापि ती अपूर्ण व

चुकीची आहे व सकृतदर्शनी त्यांना त्यात विसंगती आढळून आली आहे. आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे असे त्यांना समजते तेव्हा ती माहिती त्यांना देण्यात यावी. तरी आयोगाचे मत आहे की, आता जिल्हाधिकारी कार्यालयाने अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्जान्वये मागितलेल्या सहा मुद्दयांवरील माहितीच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य द्याव्यात. ही बाब जिल्हाधिकारी परभणी यांना व्यक्तिशः पहावी लागेल. या प्रकरणात आधीच विलंब झालेला आहे. जन माहिती अधिकारी विनाविलंब माहिती देतील याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जिल्हाधिकारी, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणात अपिलार्थीने मागितलेल्या सर्व मुद्दयांवरील माहितीच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी विनाविलंब व विनामूल्य देतील याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, मु. पो. पाथरी (इंदिरानगर) पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (म.), जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शिवाजी उध्दवराव पाटील,<br>नगरसेवक, वार्ड क्रमांक ६, नगरपरिषद, मानवत,<br>तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत,<br>तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लेखापाल, नगर परिषद कार्यालय, मानवत,<br>तालुका मानवत, जिल्हा परभणी - श्री. यु. आर. दुधाने, | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - डॉ. संतोष नामदेवराव खडसे, नगरसेवक नगर परिषद, मानवत | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १०-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती प्रश्नार्थक / खुलासेवजा मुद्दे सोडून इतर मुद्दयांवर दिनांक १४-०७-२०१० रोजी देण्यात आली आहे. यापूर्वी दिनांक २७-१०-२००९ रोजी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ ते ६ बाबतची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे त्यामुळे ती देय होत नाही असे कळविले आहे व देय असलेली माहिती दिनांक १४-०७-२०१० रोजी देण्यात आलेली आहे.

अपिलार्थीने माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिली असे व्दितीय अपिलात मोघम नमूद केले आहे. तथापि नेमकी कोणती माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी दिली याचा उल्लेख केलेला नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे यावरुन अपिलार्थीस देय असलेली माहिती देण्यात आली असल्याचे दिसून येत असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढावे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी उध्दवराव पाटील, नगरसेवक, वार्ड क्रमांक ६, नगरपरिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, नगर परिषद कार्यालय, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मानवत, तालुका मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वामन रंगनाथराव मोरे,<br>बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासन अधिकारी, कार्यालय सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड<br>- डॉ. ऊर्मीला धूत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १३-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १३-०७-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहिती घेणार होते. त्यांच्याशी फोनवर संपर्क साधण्यात आला तथापि ते माहिती घेण्यासाठी येऊ शकले नाहीत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध आहे व ते अपिलार्थीस देऊ शकतात. ही माहिती आयोगास दाखविण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी लागेल. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्यावर त्यांनी त्या माहितीची पाहणी करावी त्यात त्यांना या माहितीसंदर्भात काही त्रुटी आढळल्यास याबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसात कळवावे लागेल व असे कळविल्याप्रमाणे ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसात द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पुरवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, बी/१५४, विवेकनगर, वसमत रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कार्यालय सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी<br>- श्री. आर. एम. ईधारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अर्जदार श्री. मधुकर हिराजी मुळे रा. पूर्णा जिल्हा परभणी यांचा माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मिळणेबाबतचा अर्ज त्यांना दिनांक १७-०६-२००९ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जात नमूद करण्यात आलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने संबंधित अर्जदारास कार्यालयाचे पत्र क्र. ताकृअ/ माअ/११०४/२००८ दिनांक १३-०७-२००९ अन्वये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १५-०७-२००९ रोजी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणेबाबत पत्र देण्यात आले होते. परंतु सदर अर्जदार दर्शविण्यात आलेल्या दिनांकास कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. या प्रकारे सदरची कार्यवाही अर्ज प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत करण्यात आलेली आहे. अर्जदार वरील दिनांकास गैरहजर राहिल्याने त्यांना कार्यालयाचे पत्र क्र. ताकृअ/माअ/१२४०/०९ दिनांक १६-०७-२००९ अन्वये मागविण्यात आलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याचे दिसून आल्याने अर्ज खारीज केल्याचे कळविण्यात आले होते.

तसेच सदर अर्जदाराचे दिनांक ३०-०७-२००९ रोजीचे प्रथम अपील दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या त्याच्या कार्यालयास प्राप्त झाले. सदर अपील अर्जाचे अनुषंगाने अर्जदारास कार्यालयाचे पत्र क्र. ताकृअ/माअ/१३८५/०९ दिनांक १८-०८-२००९ अन्वये अपिलाची सुनावणी दिनांक ३१-०८-२००९ रोजी ठेवण्यात आल्याचे कळविण्यात आले तसेच संबंधित दर्शविण्यात आलेल्या दिनांकास सुनावणीस हजर राहण्याबाबत कार्यालयाचे पत्र क्र. ताकृअ/माअ/१३०६/०९ दिनांक २०-०८-२००९ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु अर्जदार दिनांक ३१-०८-२००९ रोजी अपिलाचे सुनावणीस गैरहजर राहिले. अपिलाचे सुनावणीस अर्जदार गैरहजर राहिल्याने त्यांना कार्यालयाचे पत्र क्र. ताकृअ/माअ/ १४३९ (८)/०९ दिनांक ०१-०९-२००९ अन्वये सदर प्रकरण दप्तरी दाखल करण्यात येत असल्याचे कळविण्यात आले असून त्यांना अनावश्यक पत्रव्यवहार करु नये असे कळविण्यात आले होते.

अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन पुन्हा संधी देणे उचित आहे व तशी द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, तालुका जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| | श्री. गायकवाड विठ्ठल घनशाम,<br>तथागतनगर, परभणी | : अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, परभणी | : उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-११-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या दिनांक ०६-०७-२००९ रोजीच्या अर्जान्वये सन २००२ ते दिनांक ०४-०७-२००९ पर्यंतची कौटुंबिक अर्थसहाय्य बाबत प्रतिवर्षाची विविध माहिती मागितलेली आहे. त्याचप्रमाणे आवक जावक विभागाच्या नोंदवहीच्या छायांकीत प्रती, लाभार्थ्यांची यादी, त्यांना प्राप्त झालेल्या योजनेचे लाभ इत्यादीच्या प्रती तसेच शिफारशी केल्या असल्यास त्याच्या प्रती अशी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी ,तहसील कार्यालय, परभणी यांचे दिनांक १८-०८-२००९ रोजीचे जिल्हधिकारी, परभणी

यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाचा निपटारा विहित मुदतीत करण्याकरिता रुपये १०,००० निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करणारे पत्र कागदपत्रात आढळून आले आहे.

अपिलार्थी यांच्या दिनांक ०९-०४-२०१० च्या पत्रावरुन त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही असे दिसते तसेच माहितीची मोठी व्याप्ती व २००२ ते २००९ विस्तृत कालावधी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीकरिता उपलब्ध करुन देणे व्यवहार्य आहे. यास्तव माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, परभणी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०३-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गायकवाड विठ्ठल घनशाम, तथागतनगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गा.यो.), तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शे. मोईनोद्दीन (वाहन चालक), : अपीलकर्ता
कार्यालय उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सह संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शे. मोईनोद्दीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहा. संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद<br>- श्री. ए. बी. पांडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०९-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | १७-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२००९<br>(फेरसादर दि. ०१-१२-२००९) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांची सेवाविषयक दोन मुद्दयांवर माहिती मागितली होती व ती संपूर्ण माहिती त्यांना दिनांक २९-१०-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी अपील सुनावणीच्या वेळी ही बाब मान्य केली आहे. त्यांना संपूर्ण माहिती मिळाली आहे व त्यांचे काही म्हणणे

नाही असे आयोगापुढे सांगितले. या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे असे आयोगाचे मत झाले आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शे. मोईनोद्दीन (वाहन चालक), कार्यालय उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक सामाजिक वनीकरण वृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दत्तानंद नारायण बोबडे,<br>विठ्ठल मंदिर जवळ, सोनपेठ, तालुका सोनपेठ,<br>जिल्हा परभणी | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १७-०३-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३-०७-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११-०९-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०१-२००९<br>फेरसादर दिनांक<br>०२-१२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन सदरच्या प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास ज्ञात होत नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या व्दितीय अपील अर्जामध्ये दिनांक ०१ ऑगस्ट २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीत सोनपेठ शहरात झालेल्या घरगुती व व्यावसायिक मीटर वाटपाबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सोनपेठ, जिल्हा परभणी या विभागातील संबंधित माहिती मागितली असून व ती त्यांना न मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस पुरविली नसल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे पहाणीसाठी त्यांच्या कार्यालयात एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्र छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १७-०३-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दत्तानंद नारायण बोबडे, विठ्ठल मंदिर जवळ, सोनपेठ, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.